
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



मराठी अभ्यास परिषद पत्रिका

भाषा आणि जीवन

वर्ष ८ : अंक ३ : पावसाळा १९९०

अनुक्रम

प्रकाशन : त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर)

संपादन-समिती : कल्याण काळे (प्रमुख), अशोक रा. केळकर, अंजली सोमण, द. दि. पुंडे, प्र. ना. परांजपे, मॅक्सीन बर्नसन, विजया देव, आशा मुंडले

संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके : कल्याण काळे, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७ (दूरध्वनी ३३६०६१/२४)

व्यवस्थापकीय संपर्क व पैशांचा भरणा : विजया देव, सुप्रिया ६१/१६, एरंडवणे, आयकर भवनासमोरची गल्ली, पुणे ४११ ००४ (दूरध्वनी ३३८८१५)

पत्रिकेची वर्गणी, परिषदेची वर्गणी, जाहिरातीचे दर : आवरणपृष्ठ तीन पहा.

सूचना : पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या लेखकांच्या मतांशी संपादक किंवा परिषद सहमत असतीलच असे नाही.

या अंकाच्या मुद्रणासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अंशतः अनुदान मिळालेले आहे.

संपादक : कल्याण काळे / प्रकाशक व मुद्रक : मराठी अभ्यास परिषदेसाठी विजया देव
मुद्रणस्थळ : संजीव मुद्रणालय, ४६९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

शासन, समाज आणि भाषिक धोरण

एखाद्या संमिश्र समाजासाठी एकात्म स्वरूपाचे भाषाविषयक धोरण ठरविणे ही किती जटिल समस्या असते, हे गोव्यात घडत असलेल्या घटनांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. हिंदू आणि खिश्चन धर्मीयांचा गोव्यातील जनतेत प्रामुख्याने समावेश आहे. कोकणी, मराठी, इंग्रजी या भाषा तेथे वापरल्या जातात. (पैकी कोकणी भाषेसाठी देवनागरी लिपी अधिकृत ठरविण्यात आली असली, तरी रोमन, कन्नड इ. अन्य लिप्यांमध्येही कोकणी लिहिली जाते.) आणि इंदिरा काँग्रेस व महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष हे तेथील प्रमुख राजकीय पक्ष आहेत. याशिवाय अन्य राज्यांप्रमाणे गोव्यातही शैक्षणिक दृष्ट्या प्रगत असलेल्या उच्च व मध्यम वर्गीच्या हातांत शासनाची सूत्रे आहेत. हे सर्व पैलू लक्षात घेतल्याशिवाय गोव्यातील घटनांचे आकलन आपल्याला होणार नाही.

गोव्यातील ताज्या घटनांच्या मागे महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष व गोवा काँग्रेस (फुटीर इंदिरा काँग्रेस गट) यांच्या सत्तेवर असलेल्या शासनाने आखलेले प्राथमिक शिक्षणासाठी द्यावयाच्या अनुदानाविषयीचे धोरण आहे. आपल्या घटनेप्रमाणे प्राथमिक शिक्षण ही राज्यशासनाची जबाबदारी आहे आणि प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून उपलब्ध करून देणे हे राज्यशासनाचे कर्तव्य आहे. गोव्यातील सध्याच्या शासनाने (विशेषतः म. गो. पक्षाच्या शशिकला काकोडकर या शिक्षण-मंत्र्यांनी) असा निर्णय घेतला, की गोव्यातील जनतेच्या मातृभाषा कोकणी व मराठी असल्यामुळे फक्त याच दोन भाषांच्या माध्यमांतून शिक्षण देणाऱ्या शाळांना शासकीय अनुदान मिळू शकेल. या निर्णयाचा निषेध करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी चालू शैक्षणिक वर्षाच्या आरंभी आपले कामकाज बंद ठेवले. या शाळा प्रामुख्याने खिश्चन डायोसिसतर्फे चालविण्यात येतात. (खिश्चनांच्याच जेसुइट पंथीयांनी व काही हिंदू संस्थांनी चालविलेल्या शाळांनी मात्र तत्परतेने मातृभाषेचा माध्यम म्हणून स्वीकार केला.) याच्या परिणामी शासनाने आपले धोरण थोडे लवचीक करून पुढील वर्षापासून ज्या शाळा मातृभाषेचा माध्यम म्हणून स्वीकार करतील, त्यांना चालू वर्षासाठीचे अनुदानही पुढील वर्षी देण्यात येईल, असे जाहीर केले. पण यामुळे आंदोलकांचे समाधान झालेले नाही. बंद, मोर्चा, दगडफेक, सरकारी वाहनांची जाळपोळ इ. प्रकार यथासांग पार पडले आणि विचार करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी शासनाला सवड मिळावी, म्हणून ४ ऑगस्टपर्यंत आंदोलन स्थगित करण्यात आले. आता आंदोलन पुन्हा सुरू करण्यात येत असल्याची घोषणा झाली आहे.

गोव्यातील प्राथमिक शिक्षणाबाबत देण्यात येणारी आकडेवारी लक्षात घेण्यासारखी आहे.

अनुक्रमणिका

आज सुमारे ५० हजारांवर विद्यार्थी शासकीय प्राथमिक शाळांमध्ये मराठी माध्यमातून शिकत आहेत. ख्रिश्चन संस्थांतर्फे चालविल्या जाणाऱ्या खाजगी प्राथमिक शाळांची संख्या १८० असून हिंदू संस्थांतर्फे चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांची संख्या ८० ते ९० आहे. पूर्वी कोणत्याच खाजगी शाळेला शासकीय अनुदान मिळत नसे. त्यामुळे तेथील शिक्षक वर्षानुवर्षे ३०० ते ४०० रुपये पगारावर काम करत होते. पण या शिक्षकांनाही शासकीय शाळांतील शिक्षकांएवढा पगार मिळाला पाहिजे, असा निर्णय उच्च न्यायालयाने अलीकडेच दिला. त्यामुळे खाजगी शाळांना शासकीय अनुदान देण्याचा प्रश्न निर्माण झाला. याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट अशी, की बहुसंख्य शासकीय प्राथमिक शाळा ग्रामीण भागात आहेत, तर खाजगी शाळा नागरी भागात. अर्थात इंग्रजी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागात निघाल्या तर कितीही शुल्क देऊन त्या शाळांत आपल्या मुलांना पाठविण्याची तेथील पालकांची तयारी आहे.

आत्तापर्यंतच्या विवेचनावरून असे दिसून येईल की या समस्येच्या केंद्रस्थानी शासकीय अनुदानाचा प्रश्न असला, तरी त्यात नैसर्गिक न्याय ('समान कामाला समान वेतन'), राजकारण (म. गो. पक्ष विरुद्ध इंदिरा काँग्रेस), धर्म (ख्रिश्चन विरुद्ध हिंदू), विकासातील असमतोल (नागरी विरुद्ध ग्रामीण), सत्तेची मक्तेदारी (उच्च व मध्यम वर्ग विरुद्ध कनिष्ठ वर्ग), भाषिक धोरण (शिक्षणाचे माध्यम, राज्यकारभाराची भाषा) इत्यादी अनेक प्रश्नांमुळे ही समस्या जटिल बनली आहे. गोव्याप्रमाणेच भारताच्या इतर राज्यांत आणि भारताप्रमाणेच अन्य बहुभाषिक, संमिश्र समाज असलेल्या विकसनशील राष्ट्रांतही भाषिक धोरणांची समस्या जटिल बनलेली आहे.

या समस्येवर दोन प्रकारचे उपाय योजता येतात. पहिला प्रकार हुकुमशाही धर्तीचा. म्हणजे धोरण ठरवून ते लोकांवर लादण्याचा. रशियाने हा प्रयत्न करून पाहिला. परंतु तो यशस्वी ठरत नाही असे लिथुआनिया आणि अन्य सोविएट प्रजासत्ताकांमध्ये अलीकडे घडलेल्या घटनांनी सिद्ध केले आहे. तिबेटमध्येही चिनी भाषा लादण्याचा चीन सरकारचा प्रयत्न यशस्वी ठरलेला नाही. कारण समाजमानसाचा आविष्कार भाषेतून व्यक्त होत असल्यामुळे भाषेशी समाजाची अस्मिता एकरूप झालेली असते. बाह्य दडपणाने ती मारता येत नाही. या समस्येवरचा दुसरा उपाय म्हणजे समस्येचे सर्व पदर हलक्या व समजूतदार हातांनी सोडवण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी तज्ज्ञांचे वेळेवर साहाय्य घेणे. गोव्यातील आजची समस्या ही अंतिमतः प्रादेशिक भाषा विरुद्ध इंग्रजी अशी आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश इ. अन्य राज्यांतही ती उग्र आहे. नोकऱ्यांची संधी, आर्थिक उन्नतीच्या संधी, विकासाच्या संधी इंग्रजीतील नैपुण्यामुळे अधिक मिळू शकतात, ह्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून या समस्येवरील उपाय सापडणार नाही. त्यामुळे इंग्रजी शिकण्याची संधी उपलब्ध होईल आणि त्याच वेळी प्रादेशिक भाषांतील नैपुण्यामुळे या संधी उपलब्ध होतील, अशी व्यवस्था करणे, असे दुपदरी किंवा द्विस्तरीय स्वरूप असलेला उपाय शोधणे

आवश्यक आहे. म्हणजे शिक्षणाच्या पातळीवर प्रादेशिक भाषांच्या माध्यमाचा आग्रह धरताना इंग्रजीची हेळसांड होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे आणि शासकीय कारभार प्रादेशिक भाषांतून वाढत्या प्रमाणावर कसा होईल, याचीही योजना आखली पाहिजे. यासाठी पुढील पंचवीस ते पन्नास वर्षांचा कालावधी ठरवून क्रमाक्रमाने अनुकूल बदल घडवून आणणारी पंचवार्षिक भाषिक योजना आखण्याची आणि त्यांची अंमलबजावणी सचोटीने करण्याची आवश्यकता आहे.

प्र. ना. परांजपे

कशाला काय म्हणावं ?

मी संध्याकाळी अगदी मरगळून गेलो. केव्हा एकदा बायको येते अशी जीवघेणी वाट पाहत होतो. बाळाची आई आली, तेव्हा बाळाला तिच्या हवाली केलं आणि मी घराबाहेर मोकळ्या हवेसाठी बाहेर पडलो.

हा झाला पहिल्या दिवसाचा प्रकार. अजून पहिली रात्र पाहायची राहिली होती.

बाळाची आई दिवसभर शाळेत शिकवून दमून आली होती. मग रात्री कोण जागणार ? मी दिवसभर घरी, म्हणून मीच रात्री सावध राहायला हवं. खरं म्हणजे, जो दिवसभर घरी असतो, तोही बाळाचं संगोपन करून थकलेला असतो. पण आपण झापड लावलेली माणसं घराबाहेर काम करणं म्हणजेच दमणं, असं ठामपणं म्हणत असतो. आणि या अर्थानं आपण सगळे पुरुष घरकाम करणाऱ्या स्त्रियांना कमी लेखून वागवतो. आज माझ्यावर स्त्रीची कामगिरी करण्याची वेळ आली, तेव्हा खरा प्रकार काय असतो, हे कळलं.

देवीदास बागूल, **नवे बालसंगोपन** (पुणे : इनामदार बंधू), १८२, पृ. ११.

ज्ञानदेवीतील प्रयोगरचना

माधव ना. आचार्य

ज्ञानदेवीतील प्रयोगरचनांचा स्थूल आराखडा मांडून पाहणे, एवढाच या टिपणाचा मर्यादित उद्देश आहे. त्यासाठी ज्ञानदेवीच्या शासकीय प्रतीतील पाठ घेतले आहेत. (ज्ञा/शास) एक-दोन ठिकाणी राजवाडे प्रतीचाही विचार केला आहे. (ज्ञा/राज).

मांडणीच्या सोयीसाठी टिपणाचे तीन विभाग आहेत. (अ) प्रयोगविषयक सामान्य प्रवृत्ती, (ब) विशेष रूपप्रवृत्ती-'इज' रूपे आणि (क) काही चर्चास्पद रचना.

(अ) प्रयोगविषयक सामान्य प्रवृत्ती.

प्रयोग म्हणजे, कर्ता, कर्म व क्रियापद यांचा अन्वय वा अनन्वय. या लक्षणानुसार कर्तरी, कर्मणी व भावे हे तीन प्रमुख प्रयोगप्रकार प्रथम मांडून पाहू.

(अ १) कर्तरी- कर्ता प्रथमान्त, कर्म (असल्यास) प्रथमान्त,
षष्ठयन्त किंवा शब्दयोगी अव्ययान्त,
क्रियापद- कर्तृगामी.

कर्माच्या अपेक्षेने स्वाभाविकच याचे दोन उपप्रकार होतात: (अ १.१) सकर्मक, (अ १.२) अकर्मक.

क्रमाने उदाहरणे पाहू.

(अ १.१) सकर्मक कर्तरी-

(अ १.१.१) प्रथमान्त कर्म-

उदा. आणि हें कर्म मी करीन। (४.१०३)

येथे- कर्ता- मी- प्रथमान्त
कर्म- (हें) कर्म- प्रथमान्त
क्रियापद- करीन- 'कर' धातूचे ईलाख्याती
रूप. प्र. पु. ए. व.
'मी' या कर्त्याला अनुसरणारे.

(अ १.१.२) षष्ठयन्त कर्म

उदा. विश्वा स्वधर्मसूर्यो पाहो। (१८.१७७४)
कर्ता- स्वधर्मसूर्यो- प्रथमान्त
कर्म- विश्वा- षष्ठयन्त

क्रियापद– पाहो– 'पाह' धातूचे उ–आख्याती रूप.

तृ. पु. ए. व. कर्तृगामी.

येथील 'विश्वा' या षष्ठ्यन्त रूपाच्या निमित्ताने षष्ठीविषयी थोडी अधिक माहिती नोंदू.

ज्ञानदेवी–मराठीत षष्ठी ही सामान्य विभक्ती आहे. ती अनेक विभक्तींचे अर्थ व्यक्त करते. शब्दयोगीपूर्वीही ती सामान्यरूपाप्रमाणे येते. पुढील काही उदाहरणांच्या आधारे हे स्पष्ट होईल.

— तंव **कृष्णा** मनीं नावेक । विस्मो जाला ॥ (१.१७७)
 (कृष्णा मनीं = कृष्णाच्या मनात)

— एया **संग्रामा** चित्त देइं । (३.१८८)
 (संग्रामा = संग्रामाकडे)

— **गीतार्थी** विश्व भरूं । (१३.११५४)
 (गीतार्थी = गीतार्थाने)

— निगे जैसा भास्वतु । **प्रदक्षिणे** । (१६.१९८)
 (प्रदक्षिणे = प्रदक्षिणेला)

— **डोळेयां** प्रियाचिये भेटी । (१६.१६९)
 (डोळेयां = डोळ्यांना)

— गीता आत्मेयां **निजपती** । **नीराजना** आली । (१६.२०८)
 [निजपती = निजपतीला]
 नीराजना = नीराजनास (ओवाळण्यासाठी]

— म्हणौनि जीवित जेणें **भक्ती** । दीन्हलें शेषीं । (९.४१३)
 [भक्ती = भक्तीला (संप्रदानार्थी)]

— जे **स्वकर्मा** निष्कामता । अनुसरले गा पार्था ॥ (३.१५०)
 [स्वकर्मा = स्वकर्माला (कर्मार्थी)]

— **मुनी** आंतु व्यासु देओ । (१०.२७१)
 (मुनी → आंतु या शब्दयोगीपूर्वीचे षष्ठ्यन्त रूप)

— मग चंद्रु **चेंडुवा** लागि मागावा । (११.५७१)
 (चेंडुवा→ लागि या शब्दयोगीपूर्वीचे षष्ठ्यन्त रूप)

या एवढ्या उदाहरणांवरून षष्ठीची सर्वव्यापकता (खरे म्हणजे, सामान्यरूपत्व) लक्षात येईल.

(अ १.१.३) शब्दयोगी अव्ययान्त कर्म

उदा. १   कां **सरितांतें** सागरू । त्यजी केवि ॥ (२.६०)

कर्ता- सागरु- प्रथमान्त
कर्म- सरितांतें- शब्दयोगी अव्ययान्त
क्रियापद- त्यजी- त्यज धातूचे ई-आख्याती रूप. तृ. पु. ए. व. कर्तृगामी.

उदा. २ दिवियेचां आंगिं थोरी । तरि ते बहुतां तेजातें करी ॥ (१८.१६९४)
कर्ता- ते (दीवी)- प्रथमान्त
कर्म- तेजातें- शब्दयोगी अव्ययान्त
क्रियापद- करी- कर धातूचे ई-आख्याती रूप. तृ. पु. ए. व. कर्तृगामी.

येथील दोन्ही उदाहरणांमध्ये 'तें' हे शब्दयोगी म्हणून लक्षात घेतले आहे. काही वैयाकरण त्याचा विभक्तिप्रत्ययांत समावेश करतात. (उदा. मंग-केळ अ. १२ प्रस्तावना २२) परंतु 'सि, करवि, कारणें, लागि, हूनि, आंतु' इ. शब्दयोगींप्रमाणेच 'तें' हे देखील नामाच्या षष्ठ्यन्त रूपानंतर येते. ही प्रवृत्ती लक्षात घेऊनच 'तें' चा येथे शब्दयोगी म्हणून निर्देश केला आहे.

(अ १.२) **अकर्मक कर्तरी**

उदा. १ वैद्यु पथ्य वारुनि जाये । (३.८)
कर्ता - वैद्यु - प्रथमान्त
क्रियापद - जाये - जा धातूचे ई- आख्याती रूप तृ. पु. ए. व. कर्तृगामी
कर्म नाहीच; म्हणूनच अकर्मक कर्तरी.

'पथ्य' हे 'वारूनी' या कृदंताचे कर्म आहे. प्रस्तुत प्रयोगरचनेशी त्याचा संबंध नाही.

उदा. २ ते सर्वांहीं सदा सज्जन । सोयरे होंतु ॥ (१८.१७७७)
कर्ता - ते (सज्जन) - प्रथमान्त
क्रियापद - होंतु - हो धातूचे उ - आख्याती रूप तृ. पु. अ. व. कर्तृगामी

('सोयरे' हे कर्म नव्हे. ते कर्तरी पूरक आहे; कारण ते 'सज्जन' या कर्त्याशी समानाधिकरण आहे.)

(अ १.३) **कर्तरी प्रयोग व आख्याते**

हा कर्तरी प्रयोग सर्व आख्यातांमध्ये होतो.

उदाहरणार्थ-

ई आख्यात –

आणि फुंकें भाति फुगे । रेचिली सवें चि उफगे ।
तैसा संयोग वियोगें । चढे वोहटे ॥ (१३.६६३)

ईलाख्यात –

मग हें रसभावफूलीं फुलैल । नाना फळभारें भरैल ।
तुमचेंनि प्रसादें होइल । उपयोगु जगा ॥ (११.२०)

उ – आख्यात –

माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो ।
मज झनें वासिपो । भूत जात ॥ (१३.१९७)

लाख्यात –

आणि प्रजा जे जाली । ते वसती चि कीर आली ।
कां गोरुवें बैसलीं । रुंखातळिं ॥ (१३.५९५)

वाख्यात –

तेथ निर्गुंडु मठु होआवा । कां शिवालय ॥ (६.१७९)

(अ २) **कर्मणी प्रयोग**

कर्ता – तृतीयान्त, कर्म – प्रथमान्त व क्रियापद – कर्मगामी.
उदा. १

साध्वी शांति नागविली । माया मांगि श्रिंघारिली ।
तियेकरवीं विटाळविलीं । इहीं साधुवृंदें ॥ (३.२४६)

कर्ता - इहीं (= ह्यांनी = ह्या कामक्रोधांनी)- तृतीयान्त.
कर्मे – शांती, माया – प्रथमान्त.
क्रियापदे – नागविली, श्रिंघारिली –
लाख्याती – कर्मानुसारी (स्त्री.)

उदा. २

तुवां शरीरपरां नोहावें । कामनाजात सांडावें ।
मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ (३.१८५)

कर्ता – तुंवा – तृतीयान्त
कर्मे – कामनाजात, भोग – प्रथमान्त
क्रियापदे – सांडावें, भोगावे – वाख्याती – कर्मानुसारी.
(तुवां शरीरपरां नोहावें – ही रचना मात्र भावे आहे. येथे ' शरीरपरां ' हे कर्तरी पूरक आहे.)

— कर्मणीच्या उदाहरणांमध्ये लाख्याती, वाख्याती रचना मिळतात. अन्य आख्यातां-मध्ये 'इज' रूपे मिळतात. त्यांचा विचार पुढे विभाग (ब) मध्ये करू.

(अ ३) भावे प्रयोग-

कर्ता व कर्म (असल्यास) कुणीही प्रथमान्त नसणे व क्रियापद तृ. पु. ए. व. (लाख्याती, वाख्याती नपुं.) असणे ही भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये आहेत.

कर्माच्या अपेक्षेने याचेही कर्तरीप्रमाणेच सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकार होतात.

उदा. (अ ३.१) **सकर्मक भावे**

तेणें जींतलें कर्मबंधातें। (१८.९२९)

कर्ता- तेणें- तृतीयान्त

कर्म- कर्मबंधातें- शब्द अव्ययान्त

क्रियापद- जींतलें- स्वतंत्र, जिंत धातूचे लाख्याती रूप. नपुं. तृ. पु. ए. व.

(अ ३.२) **अकर्मक भावे**

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोषावें॥ (१८.१७७२)

कर्ता – देवें – तृतीयान्त

(कर्म – नाहीच.)

क्रियापद – तोषावें – स्वतंत्र. तोष धातूचे वाख्याती रूप. नपुं. तृ. पु. ए. व.

(एणें वाग्यज्ञें – ही करणे तृतीया आहे.)

कर्मणीप्रमाणेच येथेही वाख्याती किंवा लाख्याती रचना मिळतात; अन्य आख्याती प्रयोग झाल्यास 'इज' रूपे मिळतात.

(ब) विशेष रूप प्रवृत्ती : इज रूपे

संस्कृतमध्ये ज्याप्रमाणे 'य' हा आगम (व आत्मनेपदी प्रत्यय) ही कर्मणीची नियत खूण आहे, त्याप्रमाणे ज्ञानदेवी – मराठीत 'इज' आगमयुक्त कर्मणी (व भावे) रूपे मिळतात. मूळ धातूंना हा प्रत्यय लागून नवे कर्मणी (वा भावे) धातूच तयार होतात, असे म्हणण्यास हरकत नाही.

'इज' प्रमाणेच क्वचित 'प' व 'पिज' असेही प्रत्यय काही धातूंना अत्यल्प ठिकाणी लागलेले मिळतात.

उदा. – जो कामनामात्रें न घेपे। (३.७१)

– तेथ साहंतेनि नवलें। घेपिजे ना॥ (१३.३५१)

ही प, पिज रूपे अत्यंत मर्यादित असल्यामुळें त्यांची केवळ नोंद करून पुढे जाऊ.

(ब १) इज कर्मणी

ई आख्यात –

देवा संतवृंद नमस्कारिजे ।
कां घडे तरि पूजिजे । (२.३३)

' संतवृंद ' हे प्रथमान्त कर्म (कर्ता – अध्याहृत)
नमस्कारिजे – नमस्कार धातू + इज प्रत्यय
ई – आख्याती रूप, तृ. पु. ए. व.

ईलाख्यात –

तें स्वमत बोलिजैल । अहिंसे रूप कीजेल । (१३.२४२)

येथेही ' मियां ' हा तृतीयान्त कर्ता अध्याहृत
' स्वमत ' हे कर्म – प्रथमान्त
बोलिजैल – बोल + इज, ईलाख्यात तृ. पु. ए. व.

उ– आख्यात–

कीजो क्षमा या बोला । अपत्या मज । (१३.३३४)

' तुम्हीं ' हा तृतीयान्त कर्ता अध्याहृत.
' क्षमा ' हे कर्म– प्रथमान्त.
कीजो – कर + इज, उ – आख्यात तृ. पु. ए. व.

(ब. २) इज भावे

ईआख्यात–

तिहिं मनुष्यां होइजे । मृत्युलोकिं ।। (१४.२७०)

कर्ता – तिहिं – तृतीयान्त.
क्रियापद – होइजे – हो + इज – ई आख्यात तृ. पु. ए. व.
(मनुष्यां – हे कर्तरी पूरक आहे.)

ईलाख्यात

यऱ्हविं कां आडवाटीं । धांविजैल ।। (१३.२३९)

येथे ' करणें ' हा तृतीयान्त कर्ता अध्याहृत आहे. (कर्म नाहीच.)
क्रियापद – धांविजैल – धांव + इज. ईलाख्यात तृ. पु. ए. व.

उ – आख्यात –

पुढतीं पुढतीं पुढतीं । इया ग्रंथा पुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजो ।। (१८.१७८८)

कर्ता - पुण्यसंपत्ती - तृतीयान्त.

(कर्म - नाही.)

क्रियापद - होइजो - हो + इज. उ - आख्यात तृ. पु. ए. व.

[ह्या ग्रंथा - ही पदे षष्ठ्यन्त आहेत. (= या ग्रंथाच्या) सर्व सुखीं - करणे तृतीया. सर्वभूतीं - अधिकरणे सप्तमी. संपूर्ण - क्रियाविशेषण.]

एवढ्या उदाहरणांवरून ' इज ' रूपांची वैशिष्टये लक्षात येतील.

(क) काही चर्चास्पद रचना.

पहिल्या दोन विभागांवरून ज्ञानदेवीतील प्रयोगरचनांचा स्थूल आराखडा लक्षात येईल. आता या शेवटच्या विभागात काही वैशिष्ट्यपूर्ण रचना पाहू.

यामध्ये दोन प्रकारची क्रियापदे लक्षात घ्यावयाची आहेत- (क. १) शक्य (क. २) (तथाकथित) संयुक्त क्रियापदे.

(क. १) शक्य क्रियापदे -

उदा. हे साद हि अंतष्करणें । करवे चि ना ॥ (११.५७७)

येथे ' करवे ' हे ' कर ' धातूचे शक्य रूप योजले आहे.

या वाक्यात आणखी एक पद चर्चास्पद आहे.

ते म्हणजे आरंभीचे ' हे ' पद.

राजवाडे प्रतीत हे पद नाही. (ज्ञा / राज प्रथमखंड पृ. ३५०) येथे ते का घेतले आहे, ते समजत नाही. कारण जर ते ' विश्वरूप ' या अध्याहृत पदासाठी असेल, तर ते ' ह्या ' (विश्वरूपा) असे षष्ठयन्त हवे.

येथे आणखी एक पद गृहीत आहे : ' मसि ' किंवा ' मज ' म्हणजे हे वाक्य पुढील-प्रमाणे आहे-

(मसि) (ह्या विश्वरूपा) अंतष्करणें साद हि न करवे.

(= मला या विश्वरूपाला अंतःकरणाने हाक देखील घालवत नाही.)

' करवे ' या शक्य रूपाचे मूळ धातुरूप 'करीं ' हे घेऊन प्रस्तुत वाक्य असे होईल-

(मी) (ह्या विश्वरूपा) अंतष्करणें साद हि न करीं.

येथे-

कर्ता - मी प्रथमान्त

कर्म - साद - प्रथमान्त

क्रियापद - करीं - कर्तृगामी.

प्रयोग - सकर्मक कर्तरी.

क्रियापद शक्यरूपी केल्यामुळे 'मी' चे 'मसि' असे षष्ठयन्त रूप होईल. त्यामुळे कर्तृपदावरील त्याचा अधिकार संपतो.

मूळचे 'साद' हे कर्म आता कर्तृस्थानी येते; ते प्रथमान्त क्रियापद 'करवे' हे तदनुसारी. म्हणून प्रयोग – अकर्मक कर्तरी.

(अंतष्करणें – ही करणे तृतीया.)

— अशीच आणखी एक रचना पाहू.

कां काळियाणा धुधुवातु। देखौनि न पसरवे हातु। (१८.७०९)

(काळियाणा धुधुवातु = फूत्कार टाकणारा काळसर्प.)

येथेही 'कवणा' (कोणाला)ही हे पद अध्याहृत आहे. म्हणून हे वाक्य असे–

(कवणा) हातु न पसरवे

येथेही मूळचे कर्म – हातु आता कर्तृस्थानी येते. ते प्रथमान्त; म्हणून प्रयोग – अकर्मक कर्तरी.

या दोन्ही उदाहरणांतील मूळचे धातू (कर, पसर) सकर्मक होते.

आता मुळातच अकर्मक असलेल्या धातूच्या शक्यरूपाचे उदाहरण घेऊ-

पै गा आगीमाझि न रिगवे। (१८.७०८)

(कवणा हे पद अध्याहृत.)

मूळ धातू घेऊन हे वाक्य असे–

(कवण) हि आगीमाझि न रिगे

कवण – प्रथमान्त कर्ता.

रिगे – ई– आख्याती क्रियापद.

प्रयोग – अकर्मक कर्तरी.

आता शक्यरूप घेऊन प्रयोग विचार करू–

कवणा– मूळ कर्त्याचे षष्ठयन्तरूप.

म्हणून कर्तृत्वपदावरील अधिकार समाप्त.

(कर्म नाहीच)

रिगवे- रिग धातूचे शक्य रूप → रिगव

त्याचे ई – आख्याती तृ. पु. ए. व.

प्रयोग – अकर्तृक भावे.

या विवेचनाचा अर्थ असा, की मूळ धातू सकर्मक असेल, तर त्याचा शक्यरूपी प्रयोग अकर्मक कर्तरी होतो; व मूळ धातू अकर्मक असेल, तर त्याचा शक्यरूपी प्रयोग अकर्तृक भावे होतो.

(क. २) (तथाकथित) संयुक्त क्रियापदे

संयुक्त क्रियापद- ही मराठी व्याकरणातील एक विवाद्य संकल्पना आहे. आजच्या मराठीच्या व्याकरणात ती अमान्य करणाऱ्या राजवाड्यांनी (राज / ति २७) ज्ञानेश्वरीच्या व्याकरणात मात्र ती मान्य केली आहे. (राज / ज्ञाव्या २२४). तुळपुळे ती विवाद्य असल्याचे मान्य करूनही तिचे समर्थन करतात. (तुळ ३०१) मंगरूळकरांनी आपल्या व्याकरण-पुनर्विचारात (मंग ११६) ती 'अकिंचित्कर' असल्याचे म्हणूनही ज्ञानदेवीच्या संपादित अध्यायांतील (३, ५, ९ व १२ सहसंपादक वि. मो. केळकर) टिपणांमध्ये संयुक्त क्रियापदांची नोंद केली आहे. (मंग-केळ)

'पद' ही व्याकरणातील मूलभूत संकल्पना आहे. संयुक्त क्रियापदामध्ये ती बाधित होते. म्हणूनच फक्त आख्यातरूपी धातूला क्रियापद मानून कृदंताचा वेगळा विचार करणे हे योग्य आहे. ज्ञानदेवी-मराठीत तो कसा करता येईल, हे काही उदाहरणांच्या साहाय्याने पाहू या. उदा.

हें ऐसें असे स्वभावें । म्हणौनि कर्म न संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ (३.१५८)

या ओवीचा द्वितीयार्ध लक्षात घेऊ. त्यातील वाक्य असे– संतीं विशेषें आचरावें लागे. (=संतांना तर आवर्जून आचरण करावे लागते.)

या वाक्यात 'आचरावें लागे' हे तथाकथित संयुक्त क्रियापद आहे. येथे 'आचरावें' हे 'व' कृदंत आहे. 'संतीं' हा त्याचा तृतीयान्त कर्ता आहे.

प्रयोगदृष्ट्या आख्यातरूपी क्रियापद हे महत्त्वाचे, तेव्हा 'लागे' या रूपावरच फक्त लक्ष केंद्रित केले पाहिजे. याचा कर्ता कोणता?

'संतीं' हा नव्हे. कारण 'आचरावें' या कृदंतामधील धातूशी असलेला त्याचा कर्तृसंबंध सुटत नाही. म्हणूनच ते तृतीयान्त राहिले आहे. एरव्ही ते षष्ठ्यन्त होते.

अशाच आणखी रचना नोंदू -

—तरि आणिकीं ही कुंटेपणें । चालावें लागे ॥ (१८.१६९२)

— ते सज्जनीं उपसाहावें लागे । (६.३१)

म्हणजे येथेही 'आणिक', 'सज्जन' हे शब्द कृदंतांमधील धातूंशी असलेला आपला नातेसंबंध सोडीत नाहीत. तेव्हा त्यांचा हा जुना घरोबा मान्य करून पुढे गेले पाहिजे.

आपल्या मूळ ओवीकडे पुन्हा जाऊ. तिच्या पूर्वार्धात 'कर्म' असा शब्द आहे— 'म्हणौनि कर्म न संडावें' या शब्दाचा उत्तरार्धातील चर्चास्पद वाक्यात अध्याहार करून वाक्य पुढीलप्रमाणे होईल-

संतीं (कर्म) विशेषें आचरावें लागे.

येथेही 'कर्म' हा शब्द 'आचरावें' या कृदंताच्या कर्मपदी आहे.

या कर्माच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ज्ञानदेवीमध्ये हे कर्म काही वेळा षष्ठयन्त येते.

जसे– तंव चि येया साधना भजावें लागे । (३.१४८)

असे षष्ठयन्त पद अर्थातच कर्तृदृष्ट्या तटस्थ होते. म्हणजे त्याचाही 'लागे' या आख्यातरूपी धातूशी कर्तृसंबंध पोहोचत नाही.

आता एकच पर्याय शिल्लक राहतो. 'कर्म' हा शब्द पूर्वार्धात आहे तसाच उत्तरार्धात घेऊन तो 'लागे'चा कर्ता मानावा व कर्तरी प्रयोग सांगावा. परंतु त्या पक्षी मूळचे 'संतीं' हे पद 'संतां' असे येणे प्रशस्त ठरते. जसे—

एथ श्रवणाचेनि पांगें– । विण श्रोतेयां होआवें लागे ॥

म्हणजे येथे दोन बदल करावे लागतात–

संतीं → संतां; कर्म या पदाचा अध्याहार.

इतके उपद्व्याप करून प्रयोग सांगण्यापेक्षा वाक्य जसे आहे तसे ग्राह्य मानून त्याचा प्रयोग सांगणे हे अधिक योग्य नाही का ?

आणि तसे केले, की अशा प्रकारच्या रचना पूर्वोक्त

श्रोतेयां होआवें लागे (६.२४) शी समकक्ष मानून त्यांचा विचार करता येतो. प्रस्तुत रचनेत 'होआवें' हे कृदंत कर्तृस्थानी आहे. त्याचे नपुं. रूप हे निर्विकल्प आहे. नपुं. हे सामान्यलिंग आहे; अनिर्धारण स्थळी ते येते. अर्थात प्रयोग 'भावे' होतो.

याप्रमाणेच 'संतीं विशेषें आचरावें लागे' या रचनेतही 'आचरावें' हे कृदंत कर्तृस्थानी मानून भावे प्रयोग सांगता येईल.

अशा प्रकारे तथाकथित संयुक्त क्रियापदामधील कृदंताची वेगळी व्यवस्था करता येते. मात्र त्यासाठी एखादे कृदंत कर्तृस्थानी वा कर्मस्थानीही येते, ही वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे.

उदा. कर्तृस्थानी → जेयातें अव्यक्त म्हणों ये कोडें । (८.१७७)
कर्मस्थानी → परि जाणौनियां मातें ।
जो पाहों विसरला माघौतें ॥ (७.१२१)

कृदंताची आणखी कोणत्या प्रकारे व्यवस्था लावता येते, हे पाहण्यासाठी दुसरे उदाहरण पाहू.

उदा. २ हें निफजे आतां आघवें । ऐसें बोलिजैल बरवें ॥
जें अधिष्ठलां असें परदेवें । निवृत्ती मीं ॥ (१३.११५७)
(जें= ज्या अर्थी)

ओवीचा उत्तरार्ध प्रस्तुत आहे.

'परदेवें निवृत्ती मीं अधिष्ठलां असें.'

(= श्रेष्ठ देव निवृत्तिनाथ यांनी मी अंगिकारलेला आहे.)

या वाक्यात– मीं – कर्ता – प्रथमान्त.

असें – क्रियापद कर्तृगामी.

प्रयोग – अकर्मक कर्तरी.

येथे चर्चास्पद आहे '**अधिष्ठलां**' हे रूप.

हे रूप कसे तयार झाले ?

'अधिष्ठ' धातूचे 'ल' कृदंत → अधिष्ठल (विशेषण);

अधिष्ठल + आं (क्रियाविशेषणकारक प्रत्यय).

अशा प्रकारे विशेषणांना व क्वचित नामांनाही (आं) प्रत्यय लागून त्यांपासून क्रियाविशेषणे बनतात.

जसे– गोड → गोडां

परि आतां आमुतें **गोडां** करावें ।
ऐसें तांदुळिं काइसेया विनवावें ॥ (९.३०)

वेग → वेगां

सत्राविर्येचें पाणी । जिंतलें **वेगां** ॥ (१२.५४)

(येथे वेगां– हे 'वेग'चे तृतीयान्त रूप नव्हे; तृतीयान्त रूप– 'वेगें' असे होते.)

—तेव्हा 'अधिष्ठलां' हे क्रियाविशेषण आहे. मौज अशी, की येथेही ते (उदा. १ मधील 'व' कृदंताप्रमाणे) मूळचा कर्तृसंबंध सोडीत नाही. म्हणूनच '**परदेवें निवृत्ती**' ही त्याची तृतीयान्त कर्तृपदे आहेत. (निवृत्ति यासारख्या इकारान्त पुं. शब्दाचे तृतीयान्त रूप ई कारान्त होते.)

इत्यर्थ, 'अधिष्ठलां असे' हे संयुक्त क्रियापद मानण्याचे कारण नाही. कारण येथेही अधिष्ठलां या कृदंताचे वेगळे व्याकरण सांगता येते.

तेव्हा तथाकथित संयुक्त क्रियापदामधील आख्यातरूप तेवढेच क्रियापद; कृदंत हे कर्ता, कर्म किंवा क्रियाविशेषण असते.

शेवटी याच वाक्याच्या आणखी पाठभेदाचा विचार करू. राजवाडे प्रतीत प्रस्तुत ओळ पुढीलप्रमाणे आहे–

जें **अधिष्ठली** असें परदेवें । निवृत्ती मीं ॥ (१३.११५७)

(ज्ञा/राज द्वितीय खंड ४७५)

येथील 'अधिष्ठली' हे पद चमत्कारिक वाटते. कारण ते स्त्रीलिंगी आहे.

निवृत्तिनाथ हा गुरुमाउली म्हणून का हे पद स्त्रीलिंगी आले ?

– ही एक शक्यता दिसते. म्हणजे हे वाक्य असे–

परदेवें निवृत्ती अधिष्ठली (असा) मीं असें.

(= ज्याचा परमदैवत गुरुमाउली निवृत्तींने स्वीकार केला, असा मी आहे.)

'परदेवें निवृत्ती अधिष्ठली'– ही पदे तृतीयान्त आहेत.

अनुक्रमणिका

अर्थात येथेही 'मी असें' या दोनच पदांवरून प्रयोग सांगता येतो व तो मागील प्रमाणेच अकर्मक कर्तरी आहे.

येथवर ज्ञानदेवीतील प्रयोगरचनांचा जो एक स्थूल आराखडा मांडला, त्यावरून लक्षात आलेली वैशिष्ट्ये शेवटी एकत्र करू.

१. अर्वाचीन मराठीप्रमाणेच ज्ञानदेवीतही कर्तरी, कर्मणी व भावे या तीनही रचना मिळतात.
२. 'इज' रूपे हे मात्र ज्ञानदेवी मराठीचे खास वेगळेपण आहे.
३. शक्य धातूंच्या कर्त्याचा विचार करताना मूळ धातूंपेक्षा ते वेगळे मानावे लागतात.
४. जेथे तथाकथित संयुक्त क्रियापद असेल, तेथे फक्त आख्यातरूपी धातूचा कर्ता लक्षात घेऊन प्रयोग सांगणे योग्य ठरते. कृदंतरूपाचे वेगळे व्याकरण सांगता येते.
५. ज्ञानदेवी ही पद्यरचना आहे. काही पदे अध्याहृत असतात. ती लक्षात घेऊन वाक्यरचना पाहावी लागते. मात्र अध्याहार लादून प्राप्त पदे फिरवीत बसण्यापेक्षा 'स्थितस्य गतिश्चिंतनीया' हे सूत्र अनुसरणीय ठरते.

संक्षेपांचे विवरण

(१) ज्ञा/राज–	श्री ज्ञानेश्वरी– संपादक वि. का. राजवाडे, खंड १ व २ (१९०८–१९०९)
(२) ज्ञा/शास–	श्री ज्ञानेश्वरी– प्रकाशक– महाराष्ट्र राज्य, शिक्षण खाते. तृतीयावृत्ती (१९६३)
(३) तुळ–	यादवकालीन मराठी भाषा– शं. गो. तुळपुळे, पुनर्लिखित दु. आ. (१९७३)
(४) मंग–	मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार– अरविंद मंगरूळकर, पुनर्मुद्रित आवृत्ती (१९७८)
(५) मंग–केळ–	ज्ञानदेवी–संपादित अध्याय– बारावा (१९६१) तिसरा, पाचवा (१९६३) नववा (१९६७) सं. अरविंद मंगरूळकर व वि. मो. केळकर.
(६) राज/ज्ञाव्या–	ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण– वि. का. राजवाडे, संपादक– शं. गो. तुळपुळे, साहित्य संस्कृति मंडळ प्रकाशन, (१९७९)
(७) राज/ति–	तिङन्तविचार– वि. का. राजवाडे, राजवाडे लेखसंग्रह– भाग २ मध्ये संगृहीत (१९३२)

मु. व पोस्ट– चौल, ता. अलिबाग, जि. रायगड, ४०२२०३

मराठी भाषा आणि लेखन-व्यवहार : १९६० ते ९०

विजया देव

गेल्या तीस वर्षांचा काळ हा अनेक घडामोडींनी गजबजलेला काळ आहे- संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, चीन आणि युद्ध, गोवा मुक्तिसंग्राम, आणीबाणी, स्त्रीमुक्ती चळवळ व दलित साहित्य चळवळ, भोपाळ दुर्घटना, पंजाब प्रश्न, दक्षिण ध्रुवावर भारताचा तळ उभारणे, उपग्रह सोडणे इत्यादी आशादायक धक्कादायक – चिंताजनक – अभिमानास्पद अशा परस्परविरुद्ध घटना-प्रसंगांनी हा काळ गजबजलेला आहे.

काळाचा आत्मा एखाद्या साहित्यकृतीला गवसला, तर ती कशी यशाच्या शिखरावर पोचते, वाचकप्रिय होते, याचे उदाहरण म्हणून 'स्वामी' व 'पानिपत' या कादंबऱ्यांकडे पाहता येईल. हरिभाऊ, नाथमाधव, चिं. वि. वैद्य, हडप यांच्यानंतर थांबलेली ऐतिहासिक कादंबऱ्यांची परंपरा १९६२ मध्ये 'स्वामी'च्या रूपाने सुरू झाली. तिच्या अभूतपूर्व यशाने झेप, झुंज, छावा, शिकस्त ते पानिपत असा हा ओघ अखंड चालू राहिला आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राचा शोध घेण्याची एक प्रेरणा 'स्वामी'मागे अप्रत्यक्षपणे दिसते. ही प्रभावशाली कादंबरी पात्रनिर्मिती, प्रसंगनिर्मिती, नायकाच्या शोकात्म जीवनाची कथा या बाबतीत क्रांतिकारक ठरली. पण वाचकाने या कादंबरीमुळे मंत्रमुग्ध होण्यामागे वेगळे कारण आहे. भालचंद्र नेमाड्यांच्या शब्दात सांगायचे, तर 'स्वामी'मध्ये मराठी समाजाचे समूहमानस ऐतिहासिक सूत्रातून मांडले आहे. 'तत्कालीन वैफल्यग्रस्त व पराभूत मनःस्थितीतील वाचकाला तरुण, तडफदार पण कोंडीत सापडलेल्या या पेशव्याचे चित्र भुरळ घालणारे वाटले. 'स्वामी'पासून ऐतिहासिक कादंबरी या वाङ्मयप्रकाराला या काळात पुन्हा उजाळा मिळाला. त्या परंपरेतील अलिकडची कादंबरी, 'पानिपत'. पानिपत हे आपले अभिमानस्थान आहे, हे गौरवून सांगणारी ही कादंबरी, आज खपाचे विक्रमी आकडे ओलांडते आहे. 'एखाद्या क्षेत्रात पराभव होणे म्हणजे पराक्रमाची इतिश्री होणे नव्हे', हे आवर्जून या कादंबरीकाराला– विश्वास पाटलांना– सांगावेसे वाटते. ते सध्याच्या काळाच्या संदर्भात सुसंगत आहे. जसा 'स्वामी' व तत्कालीन पराभूत मनःस्थिती यांचा मेळ जमला तसा आताचा चिंताजनक पण आशादायक काळ आणि पानिपतकालीन विजिगीषु वृत्ती एकमेकांना तोलून धरतात.

अशा या काळातील एक जिवंत चळवळ म्हणजे स्त्री-मुक्ती चळवळ. या चळवळीचे मराठी साहित्याला महत्त्वाचे योगदान आहे. १९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष घोषित झाले. त्यापुढील दहा वर्षे 'स्त्रीदशक' म्हणून जाहीर झाली आणि त्यातून झालेल्या विचारमंथनातून साहित्य निर्माण झाले. स्त्रीमुक्ती ही संकल्पना स्पष्ट करणे, जगभरच्या

स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास, चळवळ–उभारणी, संघटनाबांधणी, समाजाच्या सर्व स्तरांमध्ये जागृती या आक्रमक पायातून हे साहित्य निर्माण झालेले आहे. कथा, काव्य, नाटक या साहित्यप्रकारांमध्ये हे लेखन आहे. ‘ मुलगी झाली हो ! ’ हे ज्योति म्हापसेकरांचे नाटक हे एकच उदाहरण याबाबतीत पुरेसे बोलके आहे. याच्या जोडीलाच ‘ मिळून साऱ्याजणी ’, ‘ प्रेरक ललकारी ’, ‘ स्त्री उवाच ’ इत्यादी नियतकालिकांचे स्थायी व्यासपीठही या चळवळीने निर्माण केले आहे. प्रस्थापित पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचा निषेध, समानतेच्या हक्काची खणखणीत मागणी, फुले, आगरकर इत्यादी विचारवंतांच्या विचारांचा मागोवा ही या साहित्याची काही बलस्थाने आहेत. त्यातून एक नवी आक्रमक भाषा निर्माण झालेली दिसते.

प्रत्यक्ष जीवनात स्त्री-मुक्ती चळवळ आणि दलित चळवळ एकत्र आल्या असत्या, तर ते स्वाभाविक ठरले असते. पण त्या एकत्र झाल्या, त्या साहित्यात. उदाहरणार्थ, शांताबाई कांबळे यांचे कथन ‘ माझ्या जन्माची चित्तरकथा. ’

दलित साहित्य व त्याचा प्रभाव

दलित चळवळीतून निर्माण झालेले ते दलित साहित्य. शिक्षणप्रसारामुळे प्राप्त झालेल्या नव्या जाणिवेने दलित तरुण जीवनाकडे पाहू लागले. स्वतःच्या समाजाची शतकानुशतकापासून चालत आलेली दुःसह स्थिती, ती निर्माण होण्याची व अस्तित्वात असण्याची कारणे यांचा ते विचार करू लागले. या जाणिवेतून दलित साहित्याचा जन्म झाला. असह्य दुःख, मनोभंग, अन्यायी समाजव्यवस्था यांच्याविरुद्ध या लेखकांनी विद्रोह पुकारला. प्रामुख्याने काव्य आणि आत्मकथन या साहित्य प्रकारांद्वारे या साहित्याने मराठी साहित्यात एक प्रभावी स्रोत आणला आहे. या साहित्यामागील प्रेरणा, या साहित्याविषयी सर्वसामान्य विवेचन आणि त्याचे विशेष यांचा विचार मराठीत अन्यत्र अनेकदा होतो, होईल. त्यामुळे येथे पुनरुक्तिभयास्तव तो टाळलेला आहे. फक्त या साहित्याचा एकंदर समकालीन साहित्य–व्यवहारावर काय परिणाम झाला, ते दाखवून द्यायचे आहे.

दलित कविता समाजाभिमुख झाली. अस्सल अनुभव व्यक्त करण्यासाठी अस्सल, उग्र-दाहक भाषा आली आणि तिने प्रतिमा पुसून टाकली. ग्रेसनंतरच्या काव्यात प्रतिमा, दुर्बोधता कमी झालेली दिसते. दलितेतर साहित्यातही कविता स्वरसंजनात्मक राहिलेली नाही. विशेषतः १९७५ नंतरची कविता राजकीय– सामाजिक– आर्थिक पातळीवरील विद्रोह आक्रमकतेने व्यक्त करते. कित्येकदा आवेगपूर्ण एकामागोमाग येणाऱ्या वेगवान विधानांच्या भाषेत बोलते. रौद्र भावनात्मकता, समाजदर्शनपरता ही तिची वैशिष्ट्ये आहेत. (उदा. अर्ध्य, हेमंत जोगळेकर)

दलित आत्मकथनांचे स्वरूप एक केस मांडणे अशा स्वरूपाचे आहे. या आत्मकथनांनी आपल्या आत्मचरित्र–आत्मकथन या साहित्यप्रकाराचे दालन समृद्ध केले आहे.

अनुक्रमणिका

या लेखनाची तीन वैशिष्ट्ये दिसतात.

१. यातील बहुतेक सर्व आत्मकथने ही जेमतेम पंचविशी–तिशीच्या उंबरठ्यावर असताना लिहिलेली किंवा तेवढाच टप्पा आपल्या आवाक्यात घेणारी असतात. अनुभवांची दाहकता आणि उग्रता एवढी असते, की आयुष्याची संध्याकाळ होईपर्यंत चरित्र-लेखनासाठी थांबणे तिला शक्य नसते. ' तुम्हांला दोनदोनशे वर्षे जगून जेवढे अनुभव येणार नाहीत, तेवढे आम्हांला वीस-एक वर्षांतच येतात, म्हणून आम्ही लौकर लिहिते होतो. ही त्यामागे भूमिका आहे.

२. या सर्व लेखनात एक कमालीचा आग्रहीपणा assertiveness, दुःख भोगल्याचा ठसठसता आवेग आहे. मग तो तटस्थपणे व्यक्त होवो अथवा भडकपणे.

३. व्यक्तिदर्शन आणि समाजदर्शन घडवणे हा या आत्मकथनांचा आणखी एक विशेष.

एकंदरच मराठीतील आत्मकथनपर–आत्मनिवेदनपर लेखनाला गेल्या काही वर्षांत फार मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे, तिच्यामागे दलितांची आत्मकथने ही एक प्रमुख प्रेरणा आहे.

अन्याय सहन करावा लागलेला, उपेक्षित असा एखादा गट जागा होतो, आपल्या व्यथा बोलून दाखवू लागतो, तेव्हा ही जागृती त्या काळापुरतीच मर्यादित राहू शकत नाही. उपेक्षित जागे झाले, की समाजाच्या सर्व थरात ती जागृती पोचते, तशी काळाच्या सीमा ओलांडून ती गतकाळातही डोकावते. लेखकाच्या संवेदनशीलतेला प्राचीन साहित्यातील उपेक्षित व्यक्तिरेखांचीही जाणीव होते. महाभारतातील कर्ण रामायणातील अहिल्या, कैकेयी या उपेक्षित व्यक्तिरेखांच्या बचावाचा एक प्रयत्न कादंबरीरूपाने झालेला आपल्याला दिसतो. अभिजात साहित्याचे आकर्षण समाजमनाला असतेच. पण नेमक्या या व्यक्तिरेखांनी १९७० नंतरच साहित्यिकांना भुरळ घालणे, त्यांची त्यांनी केस मांडणे यामागे विद्रोही दलित साहित्याची प्रेरणा आहे. हे फक्त मराठीतच झाले, असे नाही, इतरही भारतीय भाषांमध्ये अशा प्रकारचे साहित्य निर्माण झाले.

१९७० नंतरच्या काळात आत्मनिवेदनपर साहित्याला बहर आलेला दिसतो. जीवनाला सामोरे जात, ' मी 'कडे महत्त्व देत कथनाच्या अंगाने जाणारे साहित्य निर्माण झाले. त्यामागे असणाऱ्या अनेक प्रेरणांपैकी दलित साहित्य ही एक प्रेरणा. बदलते सामाजिक जीवन, स्त्रीमुक्ती चळवळ, राजकीय उलथापालथी, एकंदरच घडामोडींना आलेला विलक्षण वेग या आणखी काही प्रेरणा.

या लेखनामध्ये भाषेच्या शक्ती अनेक प्रकारे वापरल्या गेल्या. आत्मकथन हा फॉर्म लवचीक झाला. त्यात अनेक प्रयोग झाले. त्यांचे ठळक विशेष हे :

१. आत्मचरित्रात्मक कादंबरी : ' दीपशिखा ' ही पद्मिनीराजे पटवर्धन यांची, व ' मृगजळातील नौका ' ही नलिनी गोखले-पटेल यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी. या

कादंबऱ्यांमध्ये आत्मचरित्रच दडलेले आहे; पण व्यवहारातील अडचणी ओलांडण्यासाठी, कादंबरीच्या आवरणाखाली जीवनानुभव दडलेला आहे.

२. ' साता उत्तराची कहाणी ' हा ग. प्र. प्रधानांचा राजकीय ललित ग्रंथ. रूढ अर्थाने राजकीय कादंबरी नव्हे. दीर्घ कथनात्मक, मोठा आशय सामावून घेणारा, आत्मकथनाची गुणवत्ता असलेला हा महाग्रंथ आहे. राजकीय इतिहासाचे साधन म्हणून या पुस्तकाला महत्त्व आहे; पण त्यातील मानवीपण हे अधिक महत्त्वाचे आहे. या सर्वाला अनुरूप असे पत्र, डायरी, त्रयस्थ निवेदन असे निवेदनाचे प्रकार यात आढळतात. गतकाळाचे डॉक्युमेंटेशन व तो काळ पुन्हा जगणे हे उद्देश या ग्रंथातून सफल होतात.

३. ' झोंबी ' (आनंद यादव), कोवळे दिवस (व्यंकटेश माडगूळकर) यांच्या अनुभवाची मागणी पुन्हा वेगळ्या फॉर्मची आहे.

एकीकडे आत्मचरित्र लिहिले जात असतानाच त्याला समांतर असा हा आत्मकथनाचा प्रकार विकसित होत आहे. एखाद्याच अनुभवापुरते हे कथन मर्यादित राहू शकते, त्याचा आवाका विस्तृत असायची गरज नसते. हा या प्रकाराचा एक फायदा. उदाहरणार्थ, ' पंचतारांकित ' (प्रिया तेंडुलकर), ' बाईंडरचे दिवस ' (कमलाकर सारंग).

आणीबाणी व त्यानंतरची निवडणूक या कालखंडाने एकंदरच समाजजीवन ढवळून निघाले. स्वातंत्र्योत्तर काळातील ही एक असाधारण घटना होती; (त्या काळात लिहिल्या गेलेल्या निषेधपर कवितांचे संकलन ' झिरपलेली किरणे ', १९७७.) या निषेधाचे एक प्रातिनिधिक स्वरूपाचे उदाहरण म्हणून र. कृ. जोशी यांच्या मूर्त कवितेचा निर्देश करता येईल.

१९७५ सालच्या ' सत्यकथे 'च्या दिवाळी अंकात र. कृ. जोशी यांची जी कविता प्रसिद्ध झाली ती म्हणजे चक्क विसाचा पाढा आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर आलेली गदा आणि सरकारी प्रचारमाध्यमातून कळसाला पोचलेल्या वीस कलमी कार्यक्रमाचा उदोउदो यांच्यावरचे हे भेदक भाष्यच आहे. कवितेच्या या सामर्थ्याचा आणि सुजाण वाचकांशी एकतान होण्याच्या तिच्या प्रकृतीचा प्रत्यय र. कृ. जोशी यांनी आणून दिला आहे. कवितेच्या आशयानुरूप आकार व मांडणी, वेगवेगळे स्तर दाखवण्यासाठी वेगवेगळ्या टाइपांचा उपयोग, व्यक्तिमत्त्वानुसार काळानुसार वेगवेगळे हस्ताक्षर असे अनेक प्रयोग त्यांच्या मूर्त कवितांमधून दिसतात. या कवितांनी पंच्याहत्तरोत्तरी मराठी कवितेला दृश्य परिमाणाची नवी वाट दाखवली आहे.

१९७८ मध्ये ' जनांचा प्रवाहो चालिला ' हे आणीबाणीच्या कालखंडातील अनुभवांचे पुस्तक, विनय हर्डीकर यांचे हे ' सांगितलेले पुस्तक ' आहे. अलिप्तपणे केलेले प्रामाणिक कथन आहे. ' देशकार्य करायला सिद्ध अशा ताज्या दमाच्या तरुण पिढीला कार्याला लावणं हे कुणी केलंच नाही. ' ही तरुण पिढीची व्यथा, ' पण ' मांज्याला पतंग कुणी जोडलाच नाही ' या शब्दात व्यक्त होते. संवादाचा जिवंतपणा, विचारांचा ओघ, विस्कळीत-

पणा नसलेली कथनात्मक महानुभावी शैली ही या पुस्तकाची ठळकपणे जाणवलेली भाषिक वैशिष्ट्ये आहेत.

भोपाळ दुर्घटनेच्या निमित्ताने निर्माण झालेलं सुबोध जावडेकरांचं 'आक्रांत', भोपाळ दुर्घटनेपूर्वीच लिहिलं गेलेलं पण प्रसिद्ध मात्र नंतर झालेलं 'रुद्रमुख' (अरुण हेबळेकर) अन्नधान्य आयातीवर बंदी घालावी म्हणून निघालेल्या पदयात्रेत लेखक म्हणून सहभागी झालेल्या दि. बा. मोकाशींचं 'अठरा लक्ष पावलं', 'अस्वस्थ दशकाची डायरी' (अविनाश धर्माधिकारी) यांचा केवळ इथे निर्देशच करत आहे.

'१९६० ते १९७० हा काळ देशी मराठी गद्यशैली रूढ करण्याचा समजला पाहिजे.' या भालचंद्र नेमाडे यांच्या विधानाशी सहमत होत असताना असे म्हणावेसे वाटते, की सत्तरनंतरचा काळ हा ही शैली रूढ झाल्याची प्रसादचिन्हे दाखविणारा काळ आहे.

वृत्तपत्रे : भाषेची विविध रूपे जिवंत ठेवणं, भाषेच्या शक्ती वापरणं, विषयानुरूप भाषा घडवणे हे कार्य वृत्तपत्रे आधुनिक जीवनात करत असतात. आणि अलीकडे 'माहिती-स्फोटा'मुळे वृत्तपत्रांनाच हे आव्हान पेलावे लागते. या दृष्टीने या दशकातील वृत्तपत्रांकडे पाहिले असता भाषेच्या बाबतीत दोन टोकाच्या गोष्टी घडलेल्या आपल्याला दिसतात. एक : निष्काळजीपणाने लिहिलेले डळमळते मराठी आणि दोन : तंत्रज्ञान, क्रीडा इत्यादी विषयांनुरूप भाषेची घडण.

एक : वर्तमानाच्या रेट्यामुळे घडामोडींना आलेल्या विलक्षण वेगामुळे ज्ञानग्रहण, चिंतन, आत्मसातीकरण आणि आविष्करण या क्रमाने होणाऱ्या आविष्काराला फुरसतच मिळत नाही. त्याअभावी घाईघाईने प्राप्त परिस्थितीत वेळ मारून नेणं हीच एक वाट राहते.

दोन : पण दुसरीकडे एक स्वागतार्ह गोष्ट घडते आहे. आज जवळ जवळ सर्व प्रमुख वृत्तपत्रांमध्ये ठरावीक दिवशी ठरावीक विषयांना वाहिलेल्या पुरवण्या असतात. विविध विषयांना विशिष्ट वार/स्तंभ नेमून दिलेले असतात. त्यामुळे विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, अवकाश, खगोलशास्त्र, वाणिज्य, निसर्ग-पर्यावरण, आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय घडामोडींचे विश्लेषण, ग्रंथप्रसार, इत्यादी सदरे नियमितपणे प्रसिद्ध होतात. नियमित लेखनामुळे भाषा-परिभाषा घडत जाते. नियमिततेमुळेच तो वाचकांच्या तोंडी रुळतेही. अवकाश व क्रीडा या क्षेत्रांतील भाषा आठवून पाहावी.

विज्ञान साहित्य : पाश्चात्त्य वाङ्मयात १९३० ते १९६० हा काळ विज्ञान साहित्याचा सुवर्णकाळ मानला जातो. मराठीत यानंतर सकस वैज्ञानिक साहित्य निर्माण झाले आहे. आणि संपूर्ण भारतीय भाषांमधील विज्ञानसाहित्यात मराठी विज्ञानकथा उत्कृष्ट आहे. मराठीत विज्ञानकथालेखक खुद्द वैज्ञानिक तरी किंवा विज्ञानाच्या विविध शाखांशी संबंध असलेले असे तरी आहेत. जयंत नारळीकर, बाळ फोंडके, अरुण साधू, लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे इत्यादी विज्ञानविषयक कल्पना मांडण्यात मराठी कुठेही कमी पडताना दिसत

नाही. या बरोबरच या ललित साहित्याला पुष्ट करणारे भरघोस वैचारिक धनही ग्रंथांद्वारे मराठीत प्रसिद्ध होते. आमची सृष्टी, आमचे धन; अंतराळ वेध; दक्षिणध्रुवाची धनश्री हळबे यांनी करून दिलेली ओळख इत्यादी.

प्रगल्भ वैचारिक लेखनाची मराठीत समृद्ध परंपरा आहे. या परंपरेत शोभून दिसेल, असे वैचारिक लेखन १९६० नंतरही अव्याहतपणे केले जात आहे, असे दिसेल. सामाजिक जीवनाचा गाभा समजायला मदत होते, ती अशा ग्रंथांनीच. ललित ग्रंथांच्या जंगमप्रेरणेला तोलून धरतात, ते असे स्थावर ग्रंथच. या काळाचा प्रातिनिधिक म्हणून येथे 'चंबळची दस्युभूमी' या ग्रंथाची निवड केली आहे. (गीता साने, १९६५) चंबळच्या दस्युभूमीचा सामाजिक आशय समजून घेऊन, तेथील समाजाच्या समस्येचा अन्वयार्थ लावायचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. तिची भूमिका 'चंबळघाटीच्या समस्येवर पुरेसे वाङ्मय नाही, म्हणून या ग्रंथाचा पसारा घातला आहे.' अशी आहे. (आपल्याला शक्य असतील, ते सर्व प्रयत्न करावे, या प्रेरणेतून 'मुंबईचे वर्णन' गो. ना. माडगावकर यांनी लिहिले, याची इथे आठवण होते.) इतिहास, विज्ञान व वस्तुस्थिती यांचा मागोवा घेत चाललेला हा अभ्यास आहे. 'दुखणे काय व कुठे झाले आहे, हे समजल्यावरच योग्य उपाययोजना करता येते.' असे गीता साने म्हणतात. आणि लक्षात येते, की अलीकडे असे लेखन करणाऱ्या अनिल अवचटांचीही नेमकी हीच भूमिका आहे.

या संशोधनग्रंथात विचारांच्या नेमकेपणाबरोबरच भाषेचा लालित्यपूर्ण वापर दिसतो. व्यक्तिचित्रणाचे कौशल्य आहे. संशोधकाची तटस्थवृत्ती, प्रामाणिकपणा आहे. 'दस्युभूमी-बद्दल जे पाहिले, ऐकले, वाचले वा चर्चिले, ते जसेच्या तसे नमूद केले आहे.' अशी नम्र, अभिनिवेशशून्य संयत भूमिका आहे.

'चंदा' या शब्दाचा अर्थ प्रारंभीच कंसात खंडणी व वर्गणी असा दिला आहे, ते वाचून गंमत वाटते. किती थोड्या कालावधीत हा शब्द मराठीत रुळून गेला!

या अभ्यासग्रंथाच्या शेवटी लेखिकेने सामाजिक जीवनातील समस्येचे खरे स्वरूप मांडल्यावर हीच समस्या कादंबरी, चित्रपट या कलामाध्यमांमधून कशी चटपटीतपणे मांडली जाते, हे दाखवून दिले आहे. एखाद्या समस्येची खरी कारणमीमांसा न देता रंजनार्थ ती सोपी केली जाते. या विचाराच्या प्रकाशात अलिकडचे 'कमला' नाटक आठवावे. वास्तविक भयानक समस्येचे या नाटकात सुलभीकरण होते.

सामाजिक समस्येचा अन्वयार्थ कलामाध्यमातून नीटपणे लावला जात आहे की, नाही, याची दखल गीता सान्यांनी घ्यावी, यात त्यांचे द्रष्टेपण आहे. चित्रपटमाध्यम हे त्यानंतर प्रभावी ठरलेले आहे. सामाजिक अन्यायावर आधारित असे किती तरी चित्रपट भारतीय भाषांमधून आज निघतात व त्यावर बुद्धिमंतांमध्ये चर्चा होतात. हे माध्यम किती जागरूक-पणे हाताळायला हवे आहे, कोणती सावधगिरी त्यात बाळगायला पाहिजे, कोणता

अनुक्रमणिका

(अभ्यासू वृत्तीचा) दर्जा बाळगला पाहिजे, याचा इशाराच त्यांनी या परिच्छेदात देऊन ठेवला आहे.

याच काळात प्राचीन वाङ्मयाच्या अर्वाचिनीकरणाच्या प्रक्रियाही सुरू झालेल्या दिसतात. याचे एक ठळक उदाहरण म्हणजे 'ज्ञानदेवविरचित अमृतानुभवाचे विंदाकृत अर्वाचिनीकरण' त्यांच्याच शब्दांत सांगायचे, तर 'जुन्या ग्रंथातील आशयाचे स्पष्टीकरण आणि भावार्थ निवेदन हे अर्वाचिनीकरणाचे लक्ष्य नव्हे. अर्वाचिनीकरणामुळे भाषेच्या दृष्टीने व त्या मर्यादेतच ग्रंथ अधिक आकलनीय होतो. हे एक प्रकारचे भाषांतर असते, रूपांतर नव्हे... फक्त भाषेच्या दृष्टीने तो ग्रंथ माझ्या समकालीनांना अधिक आकलनीय करणे हे माझ्या या अर्वाचिनीकरणाचे प्रधान लक्ष्य आहे.' (विंदा करंदीकर, १९८१, पृ. २०७).

[करंदीकरांच्या या शेवटच्या वाक्यातून एक भविष्यसूचनही होते. हे रूपांतर 'माझ्या समकालीनांसाठी' आहे. तेव्हा आणखी शेकडो वर्षांनंतर ही अर्वाचिनीकरणाची गरज शिल्लक राहतेच. आता ते अर्वाचिनीकरण- झालेच, तर- मूळ अमृतानुभवावरून होईल, की विंदाकृत अर्वाचिनीकरणावरून, याचे उत्तर भविष्याच्या पोटात दडलेले आहे.]

अगदी अलिकडचा अर्वाचिनीकरणाचा प्रयत्न अरुणा ढेरे यांचा (उर्वशी, १९९०) वेदकालीन स्त्रियांच्या मनाचे गूढ काव्यात्म रीतीने उलगडणाऱ्या कादंबऱ्या म्हणजे उर्वशी व मैत्रेयी. वेदवाङ्मयाने निर्माण केलेल्या मिथ आधुनिक ज्ञानदृष्टीने पाहणे, पण अभिजाततेशीच त्याचे नाते ठेवणे हा त्यामागचा उद्देश.

-आणि तिसरे उदाहरण, त्रिसुपर्ण (प्रभाकर पाध्ये) या दृष्टांतकथांचे सत्यकाम, नचिकेत आणि द्वासुपर्णा यांच्या कथा आजच्या काळाच्या संदर्भात उलगडताना भाषेचा वापर वेगळा होतो. भाषेचे प्रयोजन बदलते.

शेवटी नाटकाबद्दल काही निरीक्षणे. १९६० नंतर नाटक मितभाषी झाले. शब्दबंबाळपणा कमी झाला. अभिनीत करणं याला महत्त्व आलं. पण रंगमंचाशी निगडित असलेल्या तांत्रिक बाबींचा अतिरेकी वापर सुरू झाला. लोककला, पारंपरिक सांस्कृतिक खेळ यांच्यामुळे या आकृतिबंधात लवचिकता आली. नाटकाला इतर ललितकलांची जोड मिळाली. एकंदर या संयोगी कलेच्या आविष्कारात विविध प्रयोग झाले. पण इतर कलांमधून केलेल्या ग्रहणाची नवलाई ओसरली, कौतुकाचा भाग कमी झाला, की भाषेचं खरं प्रयोजन नाटकाला उमजेल.

हा निबंध संपवताना एका उणिवेचा निर्देश करावासा वाटतो. ती उणीव सकस साहित्याच्या अनुवादाची. आजपर्यंत आपल्या भाषेत कधी व्यक्त न झालेले अनुवादाने समाविष्ट होतेच. शिवाय विविध भाषिक संरचना, आकृतिबंध जिवंत राहतात. भाषेची शक्ती वाढते. नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी यांच्या प्रेरणेने अनुवाद होतात; पण ते पुरेसे नाही.

या कालखंडात आपली मुळं शोधण्याचा प्रयत्न सर्वच स्तरांमध्ये चाललेला दिसतो.

वैचारिक वाङ्मयांत 'महाराष्ट्र संस्कृती' (पु. ग. सहस्रबुद्धे), युगांत (इरावती कर्वे), भारतीय मिथ्यांचा मागोवा (विश्वनाथ खैरे) हे ग्रंथ निर्माण झाले. नाटकाच्या बाबतीत सादरीकरणात प्रयोग झाले. उदाहरणार्थ, विजया मेहतांनी 'अभिज्ञानशाकुंतल' भरताच्या नाट्यशास्त्राप्रमाणे दिग्दर्शित केले. पारंपरिक लिपिसौंदर्याची पुनःस्थापना र. कृ. जोशी यांनी आधुनिक संगणकतंत्रज्ञानाच्या प्रकाशात प्रथमच केली. विरामचिन्हांचा कार्यप्रमाणे उपयोग दाखवणारा पहिलाच लेख नुकताच प्रसिद्ध झाला. (अशोक रा. केळकर, भाषा आणि जीवन, वर्ष ७ : अंक ४) जी विरामचिन्हे आपण सांकेतिक पद्धतीने वापरतो, त्यांच्याबद्दल 'कार्यविशेषाकडून चिन्हाकडे' या सूत्रानुसार मांडणी मराठीत (व कदाचित एकंदरच भारतीय भाषांमध्ये) प्रथमच झाली.

आपल्या मातीतून आपले तंत्र, आपली संस्कृती विकसित झाली पाहिजे, आपला जीवनविषयक दृष्टिकोण घडला पाहिजे ही निकड आता जाणवायला लागली आहे. जगातील विकसित देशांनी तो धडा आपल्याला दिला आहे.

विवेचनाच्या ओघात ज्या ग्रंथांचा उल्लेख आला आहे, त्यांव्यतिरिक्त आधार :

१. कादंबरी : भालचंद्र नेमाडे, **मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप** : १९५० ते १९७५
संपादक : गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, १९८६

२. कवितेतील आणीबाणीचा निषेध : शब्दवेधी, **रुची** वर्ष बारावे, अंक अकरावा, डिसेंबर १९८९.

३. हा निबंध लिहिण्याच्या काळात प्रा. डॉ. द. दि. पुंडे यांच्याशी झालेल्या चर्चेचा फायदा झाला.

६१/१४ एरंडवन, इन्कमटॅक्स ऑफिससमोर, पुणे ४११००४

जालीम उपाय

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटनचे पंतप्रधान असताना विन्स्टन चर्चिल यांची कारभार पाहण्याची एक खास पद्धत होती. अधूनमधून आपल्या हाताखालच्या थरथर कापणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांचा निरोप येई– अमुक अमुक क्षेत्रात सध्या काय चाललं आहे हे मला अर्ध्या फाडलेल्या नोटपेपरवर लिहून पाठवा. पाल्हाळ लावायचं अन् त्यात मुख्य मुद्दा हरवायचा या सरकारी अधिकाऱ्यांच्या सवयीवर त्यांनी हा जालीम उपाय शोधून काढला होता.

सोस्यूर यांचा भाषावैज्ञानिक विचार

रवीन्द्र किंबहुने

माणसाची भाषेविषयीची जिज्ञासा जुनी असली, तरी वैज्ञानिक पद्धतीने भाषेचा अभ्यास अगदी अलीकडेच सुरू झाला. विसाव्या शतकात भाषाविज्ञान अतिशय झपाट्याने प्रगत होत गेले. भाषाविज्ञानाचा हा विकास दूरगामी परिणाम करणारा ठरला आहे. विविध मानव्यशास्त्रांच्या नवीन मांडणीसाठी भाषाविज्ञानातील काही प्रमेये पायाभूत ठरली आहेत. आधुनिक काळातील ज्ञानशाखांत झालेले मूलगामी परिवर्तन फर्दिनांद द सोस्यूर या स्विस भाषावैज्ञानिकाच्या विचारावर आधारलेले आहे.

सोस्यूर यांचा भाषावैज्ञानिक विचार नीटपणे समजून घेण्यासाठी सोस्यूरपूर्व भाषा-विचाराचा त्रोटक आणि धावता आढावा घेणे उपयुक्त ठरेल. ह्या विचारांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या क्रांतिकारी कार्याची मौलिकता आपल्याला पटते. अनेक ज्ञानक्षेत्रांप्रमाणे भाषेचा विचारही ग्रीकांपासून सुरू होतो. ग्रीकांनी भाषेचा विचार तत्त्वज्ञानाच्या अंगाने केला. प्लेटोच्या क्रेटिलसमध्ये भाषेचा ऊहापोह केलेला दिसतो. प्लेटोने भाषा स्वाभाविक मानली. त्याने फिजिस् (Physis) म्हणजे नैसर्गिक असा शब्द भाषेच्या संदर्भात वापरला. त्याला भाषा म्हणजे शब्दसंपदा, एवढाच मर्यादित अर्थ अभिप्रेत होता. नंतरच्या काळात वक्तृत्व-शास्त्राच्या विकासामुळे भाषा, भाषेचे अलंकार आणि त्यांचे व्यावहारिक उपयोजन यांशिवाय व्याकरण-विचारालाही प्राधान्य मिळाले. तर्कशास्त्र, व्याकरण आणि वक्तृत्वशास्त्र (लॉजिक, ग्रॅमर, ऱ्हेटरिक) या त्रयीला (ट्रिव्हियम्) अभ्यासक्रमात अग्रक्रम होता. यूरप-मधील प्रबोधन-काळानंतर ते १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत शब्दसंपदा (व्होकॅबलरी), व्याकरण आणि विविध भाषांचे परस्परसंबंध यांचा समावेशक विचार हीच भाषाशास्त्र फायलॉलॉजीची प्रमुख विषयवस्तू राहिली. वरील माहिती सांगताना हेतुतःच अरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाचा उल्लेख केला नाही. वास्तविक अरिस्टॉटल पाश्चात्त्य जगातल्या व्याकरणाचा जन्मदाता म्हणता येईल. त्याच्या मते भाषा संकेत आणि समूहमान्यतेने विकसित होते. तसे पाहता अरिस्टॉटलचे भाषेविषयीचे हे निरीक्षण एकदम आधुनिक म्हटले पाहिजे. 'ऑन इंटरप्रिटेशन' हा त्याचा निबंध या दृष्टीने अत्यंत मूलगामी ठरेल. जगातल्या सर्व वस्तू त्याच्या मते पदार्थ (मॅटर) आणि रूप (फॉर्म) यांची संयुगे होत. त्याने व्याकरण-क्षेत्राची मांडणी करताना शब्दांच्या जातींचा विचार केला. सर्व काही त्याने नाम, क्रियापद, अव्यय इत्यादी गटांमध्ये विभागले. आजच्या संदर्भात अरि-स्टॉटलची एकूण मांडणी कालबद्ध आणि चुकीची वाटली, तरी त्याची निरीक्षणे मौलिक होती. त्याच्या विवेचनाची मांडणी शास्त्रीय पद्धतीची होती. जाता जाता एका ऐतिहासिक

योगायोगाकडे लक्ष वेधावेसे वाटते. सोस्यूर आणि अरिस्टॉटल यांच्यामध्ये एक साधर्म्य आहे. ह्या दोघांची आपल्याला ज्ञात असलेली प्रसिद्ध पुस्तके म्हणजे 'पोएटिक्स्' आणि सोस्यूरचे 'अ कोर्स् इन जनरल लिंग्विस्टिक्स्' ही त्यांनी स्वतः लिहिलेली नाहीत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या टिपणांतून ही ग्रंथसिद्धी आपल्यापर्यंत पोहोचलेली आहे. कदाचित अरिस्टॉटलचे पुस्तक त्याने स्वतः काढलेल्या टिपणांतूनही सिद्ध झालेले असू शकेल. परंतु ह्या दोन्ही पुस्तकांचा प्रभाव सारखाच दूरगामी ठरला. यांतून एक अप्रतिहत वैचारिक परंपरा निर्माण झाली. यांना टाळून कुठलाही विचार पाश्चात्त्य जगातील वैचारिक क्षेत्रात केवळ अशक्य ठरतो.

आपण परत प्रबोधनानंतरच्या कालाकडे वळू. यात सर विल्यम् जोन्स् (१७४६-९४) यांचे नाव महत्त्वाचे आहे. ते कलकत्याला न्यायाधीश होते. त्यांचा संस्कृतचा अभ्यास होता. ग्रीक, लॅटिन आणि संस्कृत या भाषांमधील साधर्म्य त्यांना जाणवले. ह्या भाषांमधील नाते पाहिल्यावर ह्यांचा स्रोत एकच असला पाहिजे आणि ही मूळ भाषा आज अस्तित्वात नाही, असे मत त्यांनी मांडले. एशियाटिकमध्ये २ फेब्रुवारी, १७८६ मध्ये आपल्या भाषणातून त्यांनी हे विचार मांडले. त्यामुळे धार्मिक आणि पारंपरिक विचारांचा पगडा कमी व्हायला मोठीच मदत झाली. भाषेच्या संदर्भात वैज्ञानिक चौकटीच्या प्रतिष्ठेचा प्रारंभ सर जोन्स् यांच्या वक्तव्यापासून सुरू झाला, असे निश्चितपणे म्हणता येईल.

हा आढावा आणखी थोडा पुढे नेण्यापूर्वी पाणिनीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पाणिनीचा काळ साधारणपणे खिस्तपूर्व चवथे शतक मानतात. त्याने आपले व्याकरण चार हजार सूत्रांत रचले आहे. व्याकरण म्हणजे विश्लेषण, विभाजन. पाणिनीचे व्याकरण अनेक अर्थांनी व्याकरणाचा आदर्श नमुना म्हणता येईल. संक्षिप्त, सूत्रमय आणि निर्णायक असे त्याचे स्वरूप असले, तरी त्याच्या मांडणीची निखळ वर्णनात्मकता आधुनिक काळातील विचारवंतांना हेवा वाटेल, इतकी सर्वंकष आहे.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकात भाषाविषयक विचारात मूलभूत बदल झाला. भाषेबद्दल वैज्ञानिक पद्धतीने विचार करणे शक्य झाले. रास्क, ग्रिम, बॉप यांच्या संशोधन–कार्यामुळे सोस्यूरपूर्व काळात जर्मनीमध्ये तौलनिक भाषाविज्ञान वैज्ञानिक पद्धत विकसित झाली होती. या काळात भाषिक परिवर्तनाचे सिद्धांत मांडले गेले. थोडक्यात असे म्हणता येईल, की या सर्व संशोधनाचा संबंध एकोणिसाव्या शतकातील प्रतिष्ठाप्राप्त उत्क्रांतिवादाशी जोडलेला होता. परिणामी भाषाविचारातही उत्क्रांतीचा सिद्धांत केंद्रीभूत ठरला.

सोस्यूरपूर्व भाषाविचाराचा ओझरता परिचय लक्षात घेता काही गोष्टी स्पष्ट होतात. एकतर या भाषा–विचारांचा रोख ऐतिहासिक आणि तुलनात्मक असा होता. वेगवेगळ्या भाषांसंबंधी शब्दसंपदा आणि व्याकरण यांची माहिती मोठ्या प्रमाणावर गोळा झालेली होती. दुसरे असे, की संस्कृतच्या अभ्यासातून ग्रीक, लॅटिन आणि त्यांच्यांतून

उपजलेल्या भाषा यांच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषेच्या अभ्यासात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब प्राथमिक स्वरूपात सुरू झाला. अर्थात त्यावर उत्क्रांतिवादाचा पगडा होता. या पार्श्वभूमीवर फर्दिनांद द् सोस्यूर (१८५७–१९१३) हा स्विस भाषावैज्ञानिक क्रांतिकारक ठरतो.

सोस्यूर यांनी भाषेत उत्क्रांती होत नाही, केवळ परिवर्तन होते; आणि हे परिवर्तन संथ गतीने होत असते, असे ठाम प्रतिपादन केले. त्यामुळे भाषाविचारांची दिशा पूर्णपणे बदलली. सोस्यूर यांच्या भाषाविषयक कार्याचा विचार तीन टप्प्यांत करता येतो. मुळात सोस्यूर संस्कृतचे गाढे अभ्यासक तर होतेच. शिवाय त्यांच्या एकूण विचारसरणीची सुरुवातही ऐतिहासिक–तुलनात्मक अशा पारंपरिक चौकटीतच झाली. १८८० मध्ये 'अ स्टडी ऑव्ह द प्रिमिटिव्ह व्हॉवेल सिस्टम ऑव्ह दी इंडो–युरोपिअन लँग्वेजेस्' हा त्यांनी १८७९ मध्ये लिहिलेला निबंध प्रकाशित झाला. परंतु जवळ जवळ पन्नास वर्षे हा निबंध दुर्लक्षित राहिला. त्यांच्या या संशोधनकार्याचे वैशिष्ट्य असे, की हा निबंध सैद्धान्तिक स्वरूपाचा असून त्यात संरचनावादी (स्ट्रक्चरल) दृष्टिकोनाचा पुरस्कार केलेला दिसतो. शिवाय सैद्धान्तिक विवेचनाची आवश्यकताही त्यातून स्पष्ट होते. दुसरा टप्पा सगळ्यांत महत्त्वाचा आहे. सोस्यूर यांच्या मृत्यूनंतर १९१६ मध्ये चार्लस बॅली, अलबर्ट सेचहाये आणि अलबर्ट राइडलिंगर या शिष्यांनी त्यांच्या भाषाविषयक विचारांची फ्रेंच भाषेत व्यवस्थित मांडणी केली. १९५९ मध्ये वेड बास्कीन यांनी 'अ कोर्स इन् जनरल लिंग्विस्टिक्स' या नावाने मूळ फ्रेंच पुस्तक इंग्रजीत भाषांतरित केले. मूळ लेखकाने न लिहिलेल्या पुस्तकाचा एवढा दूरगामी परिणाम होणारे अरिस्टॉटलनंतरचे हे एकमेव पुस्तक असावे. अलीकडे सोस्यूर यांच्या शिष्यांनी त्यांच्या व्याख्यानांची जी टिपणे घेतली, त्यांबद्दल संशोधन करून पुस्तकाची मांडणी स्वतः सोस्यूरनी कशी केली असती, यावर चर्चा होत आहे. परंतु अशा गोष्टीला फारसे महत्त्व देण्याची गरज नाही. कारण १९१६ पासून भाषाविज्ञान आणि इतर मानव्यशास्त्रीय शाखांमध्ये जे बदल झाले त्यांवर याच पुस्तकाच्या रचनेचा खोलवर परिणाम झालेला आहे. सोस्यूर यांच्या तिसऱ्या टप्प्यातले संशोधन–कार्य मात्र काहीसे दुर्दैवी म्हटले पाहिजे. कारण एवढा मूलगामी विचार करणारा व्युत्पन्न वैज्ञानिक आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत प्राचीन ग्रंथातील अनाग्रामूस्वर संशोधन करीत राहिला. आपल्या व्याख्यानातून भाषाविज्ञानाला नवीन वळण देणारी कामगिरी केल्यावर आपल्या मांडणीमुळे उपस्थित होणाऱ्या सैद्धांतिक आणि उपयोजित समस्यांकडे सोस्यूर वळले नाहीत.

विसाव्या शतकाच्या कालमहिम्याचा, एकूण इथॉसचा विचार करताना डार्विन, फ्राइड, मार्क्स, आइनस्टाइन यांच्या नावांबरोबरच सोस्यूर यांचे नावही जोडणे आवश्यक आहे. 'अ कोर्स…' हे पुस्तक एवढे मौलिक आहे. सोस्यूरनी आजवरची भाषेसंबंधीची ऐतिहासिक स्वरूपाची चर्चा एका नव्या म्हणजे वर्णनात्मक दिशेकडे वळविली. त्यांच्या मते

भाषेचा वैज्ञानिक पद्धतीने केलेला अभ्यास एककालिक (सिन्क्रॉनिक) असला पाहिजे. भाषेच्या अभ्यासाच्या एककालिक आणि ऐतिहासिक पद्धती असू शकतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. सिन्क्रॉनी आणि डायक्रॉनी असा मूलभूत फरक त्यांनी केला.

कुठल्याही एका कालखंडातील भाषा हीच भाषाविज्ञानाच्या अभ्यासाची विषयवस्तू असते. त्या त्या काळात ही भाषा आणि तिची स्थिती ही स्वयंपूर्ण असते, असे समजूनच भाषेचा अभ्यास व्हायला पाहिजे. या विचारसरणीमुळे भाषेच्या अभ्यासात उत्क्रांतितत्त्व तसे गैरलागू ठरते. पूर्वसूरींच्या अभ्यासात प्रतिष्ठा पावलेली ऐतिहासिक पद्धती म्हणजे कालानुक्रम किंवा कालशृंखला त्यांना अभिप्रेत नाही. तत्त्वतः कुठल्याही दोन कालखंडांतील भाषेची तुलना शक्य आहे. या दृष्टीने ' देअर इज नो इव्होल्यूशन इन लँग्वेज्, ओन्ली चेंज ' हे मत मूलभूत ठरते. सृष्टीतील घटना आणि त्यांचा क्रम यांविषयी विचार करताना कार्यकारणभाव आणि सार्वकालिकता यांची नियमावली बनवता येते आणि त्यातून सृष्टीचे स्पष्टीकरण करता येते, हे एकोणिसाव्या शतकातील अध्याहृत तत्त्वज्ञान सोस्यूरनी नाकारले. त्यांच्या मते ' डायक्रॉनिक इव्हेंटस् आर ऑलवेज् ॲक्सिडेंटल ॲण्ड पर्टिक्यूलर. '

हे तत्त्वज्ञान नाकारल्यावर निर्माण होणारी वैचारिक पोकळी त्यांनी एका सुसंगत संकल्पना-व्यूहाने भरून काढली. म्हणून त्यांनी भाषिक घटकांची समग्र व्यवस्था एका कालबिंदूच्या संदर्भात अभ्यासणे हा भाषाविज्ञानाचा पाया मानला. या संकल्पना-व्यूहाची चर्चा करणे म्हणजेच त्यांच्या भाषावैज्ञानिक विचारांचा परिचय करून घेणे होय. हे करताना त्यांनी काही प्रचलित संकल्पनांची पुनर्बांधणी केली, तर काही नव्या संकल्पना मांडल्या.

सगळ्यांत महत्त्वाची आणि दूरगामी ठरलेली संकल्पना म्हणजे सोस्यूरनी भाषा आणि भाषेचा व्यक्तिपर वापर यांत केलेली तफावत. भाषा म्हणजे लांग आणि व्यक्तिपर वापर म्हणजे पॅरोल. लांग किंवा भाषा एक समग्र व्यक्तिनिरपेक्ष संस्था असते. ती एका लोकसमूहाची आणि संस्कृतीची निर्मिती असते. कुणाही एका व्यक्तीला भाषा निर्मिता येत नाही किंवा वापरून संपुष्टात आणता येत नाही. भाषा म्हणजे एक स्वयंपूर्ण सांकेतिक चिन्ह-व्यवस्था होय. ती समूहाच्या मालकीची असते आणि कुठल्याही कालखंडात परिपूर्ण असते. उलट, पॅरोल म्हणजे एका विशिष्ट समूहातील व्यक्तीने वापरलेली भाषा. वास्तविक समूहातील संप्रेषण व्यक्तींच्या पॅरोलमुळेच शक्य होते. कारण त्यामागे समूहमानसातील लांग असते. प्रत्यक्ष व्यवहारात पॅरोलच असते. याचा अर्थ असा, की अमूर्त लांगचे पॅरोल हे व्यक्तिपरत्वे व्यक्त होणारे अंशरूप होय. त्यामुळे एकाच वेळी भाषा व्यक्तिपर आणि सामाजिक असते. एका दृष्टांताने हा मुद्दा स्पष्ट होईल. आड आणि पोहरा हा तो दृष्टांत. आडातले पाणी म्हणजे लांग आणि पोहऱ्यातले पाणी म्हणजे पॅरोल. फक्त एक गोष्ट ध्यानात धरायची, की आडातले पाणी जेवढे साक्षात, तेवढी लांग साक्षात नसते. म्हणीत थोडा बदल करून लांगमध्येच नाही, तर पॅरोलमध्ये कुठून येणार ? असे आपण म्हणू शकू.

सोस्यूर यांच्या मते भाषाविज्ञानाचा प्रमुख विषय लांग आहे. पॅरोल नव्हे.

लांग किंवा भाषा समजून घेण्यासाठी भाषेच्या केन्द्रस्थानी असलेली सोस्यूरची भाषिक चिन्हांची संकल्पना लक्षात घेतली पाहिजे. सोस्यूरने भाषिक चिन्हांचे दोन घटक मानले. साइन म्हणजे चिन्ह दोन घटकांनी म्हणजे सिग्निफाईड–चिन्हित आणि सिग्निफायर चिन्हक यांनी बनलेले असते.

(सिग्निफाईड)
चिन्हित
(साइन)
चिन्ह <
(सिग्निफायर)
चिन्हक

भाषिक चिन्ह म्हणजे संकल्पना आणि ध्वनिप्रतिमा यांचे अतूट संयुग होय. सोस्यूरने आपली संकल्पना समजावून देण्यासाठी चिन्हित आणि चिन्हक यांना कागदाच्या पाठपोट बाजूचा दृष्टान्त दिला आहे. या दोन बाजू अस्तित्वात असतात; परंतु त्यांना प्रत्यक्षात वेगळे करता येत नाही. [केशवसुतांची चिन्हीकरण अशा शीर्षकाची एक कविता या ठिकाणी आठवते : चिन्हीकरण अर्थात भाव आणि मूर्ती यांचे लग्न. यांतील भाव आणि मूर्ती हे शब्द चिन्हित आणि चिन्हक या पारिभाषिक शब्दांपेक्षा अधिक समर्पक वाटतात.] भाषिक चिन्हांत ध्वनींचा क्रम अर्थरूपाने प्रतीत होतो. उच्चार आणि प्रतीत होणारा अर्थ यांचे संयुग म्हणजे भाषिक चिन्ह. भाव आणि मूर्ती यांच्या साहचर्यातून निर्माण झालेली मूर्त स्वरूपाची निर्मिती म्हणजे भाषिक चिन्ह होय. या दोन्हींतला एक घटक जरी तुटला, तरी चिन्हाचे चिन्ह म्हणून असलेले अस्तित्व संपते. एक साधे उदाहरण देऊन हा मुद्दा समजावून घेता येईल. ' हाऽऽ ' हा एक ध्वनी घेऊ. याला तसा काहीही अर्थ नाही. समजा, की जाळाकडे रांगत जाणाऱ्या मुलाला उद्देशून आईने हा ध्वनी उच्चारला. मुलाला हा ध्वनी नुसता ध्वनी म्हणूनच प्रतीत होईल. परंतु ज्वालेचा चटका बसल्यावर या ध्वनीचा पोळणे आणि वेदना यांच्या साहचर्यामुळे अर्थाची प्रतीती सुरू होईल. आणि ' हाऽऽ ' नुसता ध्वनी न राहता मुलाच्या लेखी एक भाषिक चिन्ह बनेल.


भाषिक चिन्हातील दोन घटकांचा सहचारी भाव सोस्यूर यांच्या मते सर्वथैव निर्हेतुक (आर्बिट्ररी) असतो. त्याला प्रत्यक्ष किंवा साक्षातपणाचा आधार नसतो. हा सहचारी भाव निर्हेतुक नसता, तर भाषाभिन्नता असंभव होती. सोस्यूरने यासाठी दिलेले उदाहरण असे : मराठी भाषेत ' घोडा ' या ध्वनिसमुच्चयाने एक विशिष्ट प्राणी असा अर्थ प्रतीत होतो. परंतु याच प्राण्यासाठी इंग्रजी आणि स्पॅनिश भाषेत अनुक्रमे ' हॉर्स ' आणि ' कॅबलो ' असे ध्वनिसमुच्चय वापरले जातात. प्रतीत होणारा अर्थ आणि ध्वनिसमुच्चय यांत हेतुपुरःसरता असती, तर या तिन्ही भाषांत एकच ध्वनिसमुच्चय उपयोजित झाला असता. म्हणजे ध्वनी वेगळे असले, तरी अर्थ सारखा आहे, ही गोष्ट निर्हेतुक सहचारी भावामुळेच शक्य होते. दुसरे असे, की ' घोडा ' या उच्चारणामुळे प्रतीत होणारा अर्थ म्हणजे

प्रत्यक्ष घोडा हा प्राणी नव्हे. म्हणूनच 'घोडा' या ध्वनिगुंफलेला सोस्यूर ध्वनिप्रतिमा म्हणतो. येथे एवढेच नमूद करू, की जगातल्या वेगवेगळ्या भाषांमध्ये जे ध्वनिसमुच्चय वापरले जातात आणि त्यांतून जो अर्थ प्रतीत होतो, तो भाषाविशिष्ट आणि संस्कृतिविशिष्ट असतो. वर सांगितलेला अर्थसाधर्म्याचा मुद्दा त्यामुळे मर्यादित अर्थानेच विचारात घेणे आवश्यक ठरते. वस्तुजात आणि प्राणिजात यांबद्दल वापरले जाणारे ध्वनिसमुच्चय कदाचित वेगवेगळ्या भाषांत भिन्न असले, तरी अर्थप्रतीतीबाबत साधर्म्य सूचित करू शकतात. परंतु ही पातळी सुटली आणि आपण भाववाचक नामे आणि संकल्पनांच्या विस्तृत क्षेत्रात शिरलो की भाषांचे संबंध अधिक गुंतागुंतीचे होतात.


कुठल्याही भाषेत अर्थप्रतीती किंवा संप्रेषण समग्र भाषाव्यवहारात कसे साधले जाते ? ते विशिष्ट चिन्हांच्या संदर्भात केवलस्वरूपी होत नाही. कारण मुळातच ते केवलस्वरूपी नसते. सोस्यूर यांच्या मते अर्थप्रतीतीचे प्रमुख कारण एक चिन्ह इतर चिन्हांपेक्षा निराळे असते, हे होय. अशा असंख्य, परस्परभिन्न चिन्हांची संरचना म्हणजे भाषा. म्हणून भाषेची सांकेतिकता असे आपण म्हणतो तेव्हा, त्यातला शब्द आणि अर्थ यांतील रूढ सहचारी भाव एवढाच मर्यादित विचार सोस्यूरना अभिप्रेत नाही. त्यांना या सांकेतिकतेचे स्वरूप उलगडून दाखवायचे आहे. त्यांच्या मते अर्थप्रतीती साधर्म्यावर आधारित नसून ती वैधर्म्यावर आधारित आहे. एखाद्या चिन्हाचे आपण ग्रहण करतो, तेव्हा वास्तविक आपण त्या विशिष्ट उपस्थित चिन्हाची अनुपस्थित चिन्हांशी सांगड घालत असतो. उदाहरणार्थ, 'गाय' हे भाषिक चिन्ह घेतले, तर एक विशिष्ट प्राणी आणि त्याचे 'गायपण' हे आपल्या लक्षात येते. कारण 'बैल', 'बकरा', 'घोडा' अशा इतर अनेक चिन्हांशी वैधर्म्याचे नाते आपल्या मनात प्रस्थापित होत असते. म्हणजे उपस्थित चिन्हांचा अर्थ अनुपस्थित चिन्हांमुळे कळतो. मुद्दा असा, की अर्थप्रतीतीमध्ये भाषेची समग्र व्यवस्थाच अनुस्यूत असते. समग्र भाषिक व्यवस्था या संकल्पनेबद्दल सोस्यूर यांचे विवेचन पाहिल्यावर प्लेटोच्या 'आयडिया' या मूलतत्त्वाशी त्यांच्या मांडणीची तुलना करण्याचा मोह टाळता येणे कठीण आहे. परंतु प्लेटोवाद सोस्यूरनी कौशल्याने टाळला आहे. त्यांच्या मते चिन्ह मूर्त आहे. चिन्हांची प्राथमिक प्रतीती उच्चारण अथवा ध्वनिसमुच्चय अशी होत असल्याने त्याला भौतिक जगाचा आधार असतो. म्हणून भाषिक चिन्ह मूर्त असते. सोस्यूर भाषेला मूर्त मानतात : लँग्वेज इज काँक्रीट.

भाषिक चिन्हांचे व्यवस्थापन दोन अक्षांवर होते. उभा नि आडवा. त्यामुळे भाषेतील चिन्हांचे दोन गट पाडता येतात. उभा किंवा ऊर्ध्वगामी किंवा पॅराडिग्मॅटिक अक्ष आणि दुसरा आडवा किंवा क्षितिजसमांतर किंवा सिन्टॅग्मॅटिक अक्ष.

उभ्या अक्षावर एकाच जातीच्या चिन्हांची चळत असते. त्यांतून आपण योग्य त्या चिन्हांची निवड संप्रेषणासाठी करत असतो. आडव्या अक्षावर आपण निवडलेल्या चिन्हांचा अनुक्रम लावत असतो. हा अनुक्रम कालबद्ध असतो. या अक्षावरची चिन्हांची



मांडणी स्थानपरत्वे ठरत असते. अशा मांडणीतूनच वाक्यबंध तयार होतो. खालील आकृतीवरून हे चिन्हांचे व्यवस्थापन स्पष्ट होईल.



येथवरच्या विवेचनावरून सोस्यूर यांचे समग्र भाषिक व्यवहारासंबंधीचे प्रतिपादन समजायला हरकत नाही. सोस्यूर यांच्या मांडणीमध्ये वैज्ञानिक पद्धतीचा वापर दिसतो. त्यांनी पारंपरिक, नियमबद्ध आणि मूल्यात्मक किंवा प्रिसक्रिप्टिव्ह विचार नाकारला. भाषाविज्ञानाला त्यांनी वर्णनात्मक किंवा डिसक्रिप्टिव्ह वळण दिले आणि भाषाविज्ञानाच्या

आधुनिक प्रगतीचा पाया घातला. त्यांच्या प्रतिपादनाचा एकूण रोख संरचनावादी किंवा स्ट्रक्चरल आहे. विविध घटकांची बहुस्तरीय संरचना म्हणजे भाषा आणि भाषिक व्यवहारात समग्र व्यवस्थाच कार्यरत असते. भाषिक चिन्हाची संकल्पना त्यांच्या भाषावैज्ञानिक विचारात केंद्रस्थानी आहे, असे म्हणता येते.

मानवी व्यवहारात भाषा ही संप्रेषणाची एक चिन्हव्यवस्था आहे, असे मूलगामी प्रतिपादन सोस्यूर यांनी केले. माणूस आपले जीवन व्यतीत करताना असंख्य चिन्हव्यवस्था निर्माण करतो : मॅन इज अ साइन क्रिएटिंग ॲनिमल. त्यांच्या मते या सर्वच चिन्हव्यवस्थांचे एक व्यापक किंवा समावेशक विज्ञान शक्य आहे. या विज्ञानाला सोस्यूर यांनी चिन्हविज्ञान किंवा सिमिऑलॉजी असे नाव दिले. भाषाविज्ञान या व्यापक चिन्हविज्ञानाची एक शाखा आहे. आज चिन्हविज्ञान विकसित होत आहे. सोस्यूरनी या ज्ञानक्षेत्राविषयी अचूक भाकित केले होते.

सोस्यूर यांच्या भाषावैज्ञानिक विचारांचा प्रभाव इतर मानव्यशास्त्रांवर पडलेला आहे. आधुनिक काळातील संरचनावाद, तत्त्वज्ञानातील लाकाँ, फुको किंवा डेरिडा यांचे कार्य, मानववंशशास्त्रातील क्लॉड लेव्ही स्ट्राऊस यांची सैद्धान्तिक मांडणी आणि शैलीविज्ञानासारख्या शाखा सोस्यूर यांच्या विचारांचा खोलवर ठसा घेऊनच स्वतंत्रपणे विकसित झालेल्या आहेत. या क्षेत्रांमध्ये सोस्यूर यांची साइन किंवा भाषिक चिन्हाची संकल्पना एक नमुना किंवा प्रतिमान (मॉडेल) म्हणून वापरली गेलेली आहे. वर म्हटल्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या सांस्कृतिक आणि वैचारिक पर्यावरणाचा समग्रतेने विचार करताना सोस्यूर यांच्या भाषावैज्ञानिक विचारांना अग्रस्थान द्यावे लागेल, हे निश्चित.

इंग्रजी विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ४३१००४.

मायबोली मराठीला वाचवा !

शेवटी मला सतत वाटणारी खंत आपणांसमोर व्यक्त केली पाहिजे. माझ्या मायबोलीचे काय होणार, अशी ही खंत आहे. तुकाराम– ज्ञानेश्वरांची मराठी समजणारे वाचक झपाट्याने कमी होत चालले आहेत. पसायदान हा शब्द पायसदान असा उच्चारणारे विद्यार्थी आढळू लागले आहेत. लहानशा गावातही इंग्रजी माध्यम असणाऱ्या शाळा जोरात चालतात, हे कशाचं लक्षण आहे ? या इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांची अशी काही दुरवस्था, की मारुतीला ते ‘ मंकी गॉड ’ आणि गणपतीला ‘ एलेफंट गॉड ’ म्हणतात. माझी आपणा सर्वांस विनंती आहे, की देवांचं असं वस्त्रहरण होऊ देऊ नका. मायबोली मराठीला वाचवा !

[श्री. गो. नी. दांडेकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकट झालेल्या ‘ मनोगता ’तून]

कालिदास आणि लिपी व अध्ययन

डॉ. श्री. वा. सोहोनी

पुढील श्लोकामध्ये खूप गहन अर्थ भरलेला आहे.

स वृत्तचूलश्चलकाकपक्षकैरमात्यपुत्रैः सवयोभिरन्वितः ।

लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयं नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ॥ रघु. ३.२८.

आर्थर रायडरने या ओळींचे भाषांतर पुढीलप्रमाणे केले आहे.

" The baby hair must needs be clipped; yet he
retained two dangling locks, his cheeks to fret.
And down the river of alphabet
He swam with other boys, to learning's sea. "

यावरून आपल्याला पुढील दृश्याची कल्पना करता येईल. सारख्याच वयाची लहान मुले मुळाक्षरे शिकण्यासाठी एका रांगेत बसली आहेत. एकाच्या डोक्यावर शेंडी असून बाकीच्या मुलांच्या डोक्यांवर काकपक्ष पद्धतीची झुलपे राखलेली आहेत. पाठ घोकताना त्या मुलांची डोकी हलताहेत, त्या वेळी त्यांच्या डोक्यांवरील झुलपेही हलताहेत. अशाच प्रकारच्या मुलांच्या घोळक्यावरून कालिदासाला देवनागरी बाराखडीचे वर्णन करण्यासाठी उपमा सुचली असली पाहिजे. देवनागरीची मूळाक्षरे तयार झाली; तेव्हांपासून त्यातील एका व्यंजनचिन्हामध्ये बारा स्वरचिन्हे मिसळताना आपल्या देशात त्या व्यंजनाच्या ज्या विकृती केल्या जातात, त्यांना बाराखडी म्हणतात.

प्राचीन भारतामध्ये आणि साधारणपणे आजच्या काळातही मुलांना अक्षर मोठ्याने वाचावे लागते. त्यायोगाने त्यांच्या मनात त्या अक्षराचे लिखित रूप आणि त्याचे ध्वनि-रूप यांची पक्की खूणगाठ तयार होते, हे आपणां सर्वांना चांगले माहीत आहे. म्हणूनच, पुढचा कोणताही वाङ्मयाचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी अगोदर अक्षरे व त्यांची योग्य ती ध्वनिरूपे शिकून तयार झालीच पाहिजेत.

आपल्या साथीदारांचे नेतृत्व करणाऱ्या रघूचा निर्देश कालिदासाने प्रथम केला आहे, आणि त्याचे 'वृत्तचूलः' (डोक्यावर मध्यभागी केसांचा एकच झुपका असलेला) असे वर्णन केले आहे. हे सांगत असताना कालिदासाने कौटिल्याच्या पुढील शब्दप्रयोगाचे अगदी जवळून अनुकरण केले आहे. कौटिल्य म्हणतो, 'वृत्तचौलकर्मा लिपिं संख्यानं चोपयुञ्जीत।' (अर्थशास्त्र १.२) जेव्हा एखाद्या व्यंजनाच्या बारा स्वरांनुसार विकृती केल्या जातात, तेव्हा त्या बहुधा त्या व्यंजनाच्या शिरोभागी मात्रा आणि खालच्या भागाशी वेला यांच्या साहाय्याने केल्या जातात. म्हणूनच रघूच्या सवंगड्यांचे काकपक्ष अथवा

झुलपे यांचा उल्लेख हलणारी अथवा ‘ चल ’ या शब्दाने केला आहे. या मुलांचे एकच वयाचे असणे (सवयोभिः) का योग्य होते, अथवा ‘ अन्वितः ’ म्हणजे ‘ एकामागून एक क्रमाने येणारा ’ या शब्दाचा हेतुपुरस्पर वापर का झाला, हे यावरून स्पष्ट होते.

आता कालिदासाच्या काळात प्रचलित असलेली लिपी म्हणजे विदर्भातील शिरोभागी चौकोनी आकृत्या असलेली ब्राह्मी लिपी जर लक्षात घेतली, तर वरील विश्लेषण चांगल्या तऱ्हेने कळू शकेल. आणि कालिदासाच्या सूचक शब्दांतून एक सुरेख चित्र डोळ्यांसमोर उभे राहू शकेल. तेव्हा हे साम्य (बाराखडीतील अक्षरे आणि पाठ घोकणारी मुले) किती तंतोतंत आहे, हे कोणालाही त्यावरून कळू शकेल. (आकृती क्र. १ पाहा). आकृती क्र. २ मध्ये बारहुत शिल्पातील लहान विद्यार्थी पाठ घोकून शिकत आहेत, या दृश्याची

Fig. I.




Fig. II



रेखाकृती दाखवली आहे. त्यामुळे कोरीव लेखाच्या अभ्यासकाच्या दृष्टीने हा श्लोक म्हणजे एक मेजवानीच आहे. त्यातून कालिदासाची प्रसन्न विनोदबुद्धीही वारंवार प्रकट होते. कॉनन डॉइलच्या 'लाल डोक्याची टोळी' या कथेत त्याने निरनिराळ्या अवस्थांतील मानवी आकृतींच्या साहाय्याने मुळाक्षरे कशी तयार करण्यात आली, याचा एक प्रसंग वर्णन केला आहे. कालिदासाने इथे जे चित्र उभे केले आहे, ते वरील कथेतल्या प्रसंगा-पेक्षा कमी मनोरंजक नाही.

अक्षरांची ओळ शांतपणे मनातल्या मनात वाचता येते. पण असले वाचन उपयुक्त ठरत नाही. पाठ घोकताना तर ध्वनिचिन्हाला महत्त्व असते. वास्तविक पाहता (पूर्वीच्या काळी) शुद्ध उच्चारण हे कष्टाने साध्य करण्याचे मुख्य उद्दिष्ट असे. अनेक प्रतिभावंतांप्रमाणे कालिदासाचेदेखील अक्षर आणि त्याचे ध्वनिरूप आणि त्याचा अर्थ यांच्यांतील साहचर्याकडे लक्ष वेधले गेले होते. या संदर्भात वाङ्मय शब्दातील श्लेष लक्षात येतो. येथे वाङ्मय म्हणजे मुळाक्षरांचा अभ्यास– केवळ अक्षरे वाचून नव्हे, तर ती मोठ्याने वाचून केलेला अभ्यास अभिप्रेत आहे. पाणिनीचा अभ्यास करणाऱ्या अभ्या-सकांना हे ठाऊक आहे, की (पूर्वी) मौखिक परीक्षेत उमेदवारांनी केलेल्या उच्चारणांच्या चुकांवरून त्यांना क्रमांक देण्यात येत असत. पतंजलीनेदेखील मोठ्याने वाचणे आणि हळू आवाजात वाचणे यांचे निर्देश केले आहेत. पाणिनीने वापरलेल्या अध्ययन या संज्ञेचा अर्थ एका टीकाकाराने, 'गुरूच्या मुखातून अक्षरे ज्या क्रमाने बाहेर पडतील, त्याच क्रमाने विद्यार्थ्यांनी त्यांची पुनरावृत्ती करणे' अशा प्रकारे स्पष्ट केला आहे. "गुरुमुखादक्षरानु-पूर्विग्रहणम् अध्ययनम्, शब्दार्थज्ञानवेदनम्" बालमनोरमा (आर्. के. मुखर्जी यांनी आपल्या 'एन्शन्ट इंडियन एज्युकेशन' या ग्रंथात पृ. २३९ वर केलेल्या उद्धरणावरून). कालिदासाने 'ग्रहण' शब्दाचा प्रयोग 'गुरुमुखाने आत्मसात करणे' या तांत्रिक अर्थानेच केला आहे, आणि हे ग्रहण 'यथावत्' म्हणजे प्रत्येक वेळी अचूक असणे आवश्यक असे. अशा तऱ्हेने दुसऱ्या ओळीतील 'लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयम्' या पहिल्या भागाचा अर्थ स्पष्ट झाला. अक्षराची निरनिराळी रूपे लक्षात ठेवण्यासाठी गुरूंनी दाखवलेल्या उच्चारानुसार विशिष्ट क्रमानेच उच्चारली जात.

या विवेचनाचा, कालिदासाचा दुसरा एक श्लोक समजण्यासाठी उपयोग होतो. त्या श्लोकात कालिदासाने 'अध्ययन' किंवा पाठांतराची चर्चा केली आहे.

> रामादेशादनुगता सेना तस्यार्थसिद्धये ।
> पश्चादध्ययनार्थस्य धातोरधिरिवाभवत् ।। रघु. १५.९.

याच्या अगोदरच्या श्लोकात त्याने शत्रुघ्न शब्दाचा जो स्पष्टार्थ आहे, त्याचा आवर्जून उल्लेख केला होता.

आदिदेशाथ शत्रुघ्नं तेषां क्षेमाय राघवः ।
करिष्यन्निव नामास्य यथार्थमरिनिग्रहम् ॥ रघु. १५.६

त्याच्या मनात हाच अर्थ होता, आणि त्याने हेच सुचवायचा प्रयत्न केला आहे, की शत्रुघ्नाचे स्वतः मोहिमेवर जाणे म्हणजेच शत्रूंचा वध करण्याचे कृत्य होय. आणि त्यामुळे त्याला तसे पाहिले असता मदतीची खरी आवश्यकता नव्हती. रामाच्या आज्ञेवरून (म्हणजे गुरुजन अथवा ज्येष्ठ ह्यांच्या वचनानुसार) त्याच्या मदतीसाठी त्याच्या मागून जाणारे सैन्य म्हणजे पाठ घोकण्याची क्रिया होय. (ती 'इ' धातू व त्याचा उपसर्ग अधि यांनी सुचविली आहे.) यावरून हे स्पष्ट दिसते, की रामादेश हा शब्द 'गुरुमुखा'शी जुळण्यासाठी श्लोकात (हेतुपुरःसर) घातलेला आहे. अशा तऱ्हेने ही उपमा पूर्ण होते.

लिपीचा अशा तऱ्हेने घोकंपट्टीचा अवलंब करून केलेला अभ्यास म्हणजे शिक्षणातील पहिला टप्पा होय. त्याच्या साहाय्याने अखेर व्यापक वाङ्मयीन संदर्भातील शब्दांच्या गहन अर्थाकडे कसे जाता येते, हेसुद्धा येथे सूचित केले आहे आणि त्यामुळे या श्लोकाचे ते एक प्रमुख आकर्षण आहे. 'नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ।' यापुढे कालिदासाने चार विद्यांच्या ग्रहणक्रियेचे चार समुद्रांचे उल्लंघन करण्याच्या क्रियेशी साम्य दाखवले आहे.

"धियः समग्रैः स गुणैरुदारधीः क्रमाच्चतस्रश्चतुर्णवोपमाः ।
ततार विद्याः पवनातिपातिभिर्दिशो हरिद्भिर्हरितामिवेश्वरः ॥ रघु. ३.३०


शब्द, त्यांचा अर्थ, त्यांचा उच्चार यांचा अभ्यासक असलेल्या दुसऱ्या एका कवीने म्हणजे बाणभट्टाने 'सरस्वतीतीरे स्फुटं व्यराजन्त राजयो वर्णानाम् ।' असे म्हटले आहे. 'नदीमुखेन' या शब्दातील नदी शब्दाने कोणती नदी अभिप्रेत आहे, ते 'सरस्वतीतीरे' या श्लिष्ट शब्दयोजनेने स्पष्ट केले आहे. त्या शब्दाचा अर्थ सरस्वती नदीच्या तीरावर किंवा पहिल्या टप्प्यावर, असा आहे. अशा प्रकारे त्याने कालिदासाच्या सुंदर श्लोकाला एक सुंदर तळटीपच जोडली आहे.

प्राचीन काळी वर्णमालेतील अक्षरे लिहायला शिकण्यासाठी जमिनीवर ती काढण्याचा सराव केला जात असे. हे लक्षात घेऊन बाणभट्टाने 'सरस्वतीतीरा'च्या संदर्भात आपले निरीक्षण नोंदवले आहे.

पण हा सूचित झालेला तपशीलसुद्धा त्याने कालिदासापासूनच घेतला आहे. कारण त्याने वर्णमालेतील अक्षरांच्या रांगा किंवा व्यंजनांच्या विकृतींनी झालेल्या (बाराखडीच्या) ओळी यांची तुलना शेवटी सागरात मिसळून जाणाऱ्या पाण्याच्या समांतर प्रवाहाशी केली आहे. अक्षरांच्या (समांतर) ओळीसुद्धा शेवटी विद्येच्या सागरातच मिसळून जातात.

खरे पाहता कालिदासाने या कल्पनेचा दुसऱ्या संदर्भात फार चांगला असा उपयोग करून घेतला आहे. काळ्या शाईसारख्या काजळाने रेखाटलेल्या ओळीप्रमाणे दिसणाऱ्या,

फुलांच्या पांढऱ्या अथवा लाल पाकळ्यांवर एकदम येऊन बसणाऱ्या भुंग्यांच्या रांगा पाहून तो प्रभावित झाला होता. बकुल फुलांवर येऊन बसणाऱ्या भुंग्यांच्या लांब रांगांचं हे सुंदर दृश्य त्याने नोंदवलेच आहे. (आयतपंक्तिभिः –रघु० ९–३०) हीच कल्पना त्याने ' अलिभिरंजनबिंदुमनोहरैः कुसुमपंक्तिनिपातिभिरङ्कितः । ' रघु० ९.४१ मध्येही त्याने पुनरावृत्त केली आहे.




याच कल्पनेवर आधारित असेच कल्पनारम्य उदाहरण कालिदासाने कुमारसंभवाच्या ३ ऱ्या सर्गात केलेल्या वसंतऋतूच्या वर्णनात मिळते.

सद्यः प्रवालोद्गमचारुपत्रे नीते समाप्तिं नवचूतबाणे ।
निवेशयामास मधुर्द्विरेफान्नामाक्षराणीव मनोभवस्य ॥ रघु. ३.२७.

मधु म्हणजे वसंतऋतूने द्विरेफांना म्हणजे भुंग्यांना (तद्वाचक भ्रमर शब्दामध्ये दोनदा ' र ' हा ध्वनी आला आहे, म्हणून त्यांना द्विरेफ म्हणावयाचे) मदनाच्या पाच प्रसिद्ध बाणांपैकी एकावर, म्हणजे आम्रमंजरीवर मनोभवाच्या (मनात उत्पन्न होणाऱ्या कामभावनेची देवता म्हणजे मदन) नामाक्षरांप्रमाणे स्थापित केले, (असा याचा भावार्थ आहे). यावरून सैन्यातील धनुर्धरांच्या एका कृतीचे स्मरण होते. आपल्याला वापरावयाच्या बाणावर धनुर्धर स्वतःचे नाव अंकित करत असत. आता आम्रमंजरीच्या लोंबणाऱ्या घोसावर मनोभव हा शब्द ब्राह्मी लिपीच्या अक्षरांचा वापर करून कसा अंकित करता येतो, हे पुढील चित्रावरून समजून येईल.

कालिदासाने ' नवचूत बाणे ' या शब्दप्रयोगात ' बाण ' शब्दावर जोर दिलेला होताच. त्याने केलेल्या या गौरवाची जणू परतफेडच बाणभट्टाने हर्षचरिताच्या आरंभीच्या श्लोकांमध्ये त्या महाकवीची पुढीलप्रमाणे स्तुती करून केली आहे.



बकुलपुष्पः

निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसान्द्रासु मञ्जरीष्विव जायते ॥ हर्षचरित १.१६.

या ठिकाणी कालिदासाच्या श्लोकांची आंब्याच्या कोवळ्या मोहराशी तुलना केली आहे. दोहोंतील साम्य म्हणजे लोकांना आकृष्ट करणारा सुंदर स्वाद. एका प्रतिभावंताने आपल्या एका श्रेष्ठ पूर्वसूरीला वाहिलेली ही एक सुंदर आदरांजली होय. कालिदासाच्या श्लोकातील 'नवचूतबाणे' हा शब्दप्रयोग बाणभट्टाच्या 'मधुरसान्द्रासु मञ्जरीषु' या शब्दप्रयोगाशी तंतोतंत जुळतो. शब्दाशब्दांतून आणि अक्षराअक्षरांतून प्रकट होणारे महाकवींचे मार्ग विलक्षण होत.

कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

['Caltis 85' या विशेषांकावरून अनुवादित. अनुवादक : कल्याण काळे. मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७. 'इन्स्टिट्यूट ऑफ टायपॉलॉजिकल रिसर्च'च्या सौजन्याने.]

' पुन्हा म्हणा ! '

इरीना ग्लुश्कोव्हा

मी मराठीचा अभ्यास करायला सुरुवात केली, तेव्हा ' पुन्हा म्हणा ! ' हे मी शिकलेले पहिलेच वाक्य होते. म्हणजे ' म्हटलेले मला समजले नाही ', अशा अर्थाचा हा इशारा होता. मराठी भाषेच्या रस्त्याने अनेक वर्षे प्रवास करता करता हे वाक्य परत परत म्हणावे लागते. हे वाक्य कोणकोणत्या संदर्भात जिभेवर येत असते, यासंबंधी विचार या लेखात मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. चोखंदळ वाचकाला मराठी भाषेच्या रशियन भक्ताने मराठीतून व्यक्त केलेले विचार नीट लक्षात आले नाहीत तर ' पुन्हा म्हणा ' ऐकायला माझी तयारी आहे.

परकीय भाषेतून बोलणे कधीच सोपे नसते. पण बोलण्यापेक्षा समजून घेण्याची प्रक्रिया कितपत अवघड असते, याचा मला भरपूर अनुभव आहे. या लेखाची कल्पना आली, त्या वेळी डॉ. मॅक्सीन बर्नसन यांचा ' एका काचेतून अंधुकपणे (सहज) ! ' हा लेख मी अजून वाचला नव्हता. नंतर वाचल्यावर त्यांच्या व माझ्या एकसारख्या अनुभवाने समाधान वाटले– म्हणजे मी एकटीच तशी नाही. माझ्यापेक्षा खूप वर्षे महाराष्ट्रात राहिलेल्या आणि मराठीवरच प्रभुत्व मिळवलेल्या मॅक्सीन यांचा सुद्धा तोच अनुभव !

भाषा ही संवाद साधायचे माध्यम असून परस्परसंवादाचा प्रसंग येतो, तेव्हा मराठीतून बोलत असताना मी काय बोलेन, त्या मानाने मला काय कळेल, याकडे जास्त लक्ष देते. मी आणि मराठी माणूस यांच्यांत जेव्हा अडथळा आणणारी एखादी अदृश्य किंवा दृश्य गोष्ट येते, तेव्हा माझी समजून घेण्याची कुवत या गोष्टीला अडून मंद होते. हे सर्व येऊ शकणारे अडथळे अपेक्षित असल्यामुळे त्यांचे वर्गीकरण करून, त्या वर्गीकरणाप्रमाणे मनाची तयारी करून, त्यांना तोंड देता येईल. मात्र रशियन माणसाचे बोलणे लक्षात येण्यासाठी मला कधीच अशा प्रकारची मनाची तयारी करावी लागत नाही, यामुळे मराठी समजून घेताना मनावर जो ताण पडतो, तो मी रशियन बोलताना कधीच पडत नाही.

पहिला अडथळा म्हणजे Phonetical आणि Phonological अडचणी होय. जे मराठी ध्वनी रशियन भाषेत नाहीत, तेच ध्वनी खूपदा नीट ओळखता येत नाहीत. उदाहरणार्थ, रशियन भाषेत मूर्धन्य नसतात. म्हणून ट, ठ, ड, ढ, ण, ळ हे ध्वनी असलेले शब्द मला नीट ऐकू येत नाहीत. तीच गोष्ट महाप्राण असलेल्या शब्दांची. मी माझ्या मातृभाषेच्या Phonological patternची गुलाम आहे, यात काही नवल नाही. आणि

दोष लावायचा असेल, तर गुलामाला लावावा — तो एकाच धन्याची कामे करतो म्हणून. पण त्याशिवायही वेगळ्या स्वरूपाचा Phonetical त्रास होतो. एखाद्या माणसाच्या बोलण्यात एखादी उणीव असली, एक दोन दात काढण्यात आल्यावर त्याची जीभ जड पडली आहे, किंवा तो तोंडात पान ठेवून बोलतो, किंवा लहान मूल अजून ध्वनी बरोबर उच्चारता येत नसल्याने बोबडे बोलते, तर अगदी जीव तोडून दोन्ही कानांना अतिकडक हुकूम सोडल्याशिवाय समजून घेणे अर्धवट राहते.

दुसरा अडथळा म्हणजे अंतर आणि तंत्र. दूरध्वनीवर बोलताना थोडीफार अडचण येते. एक तर संवाद करणाऱ्यांचा आवाज तांत्रिक कारणांसाठी बदलतो, कधी-कधी नीट ऐकू येत नाही. ज्याच्याशी मी फोनवरून बोलते, त्याची मातृभाषा रशियन असली, तर कमी ऐकू येणारे शब्द मला ओळखता येतात. परकीय शब्दांची इतकी सहज ओळख होत नाही. तीच गोष्ट नभोवाणीची किंवा दूरचित्रवाणीची. या प्रसंगी मात्र समजून घेण्याचे प्रमाण आणखी कमी होते. कारण मला ताबडतोब उत्तर द्यावे लागत नाही किंवा ऐकलेल्यानुसार वागावे किंवा कार्य करावे लागत नाही. म्हणून काही केले, तरी मन लक्ष केंद्रित करायला आळस करते. याउलट रशियन रेडिओ किंवा नभोवाणीच्या निवेदकाचा आवाज मी झोपत असताना, गप्पा मारण्याच्या नादात असताना, आजाराने अगदी मरणाच्या उंबरठ्यावर असताना, काही केले, तरी अचूक समजतो. नाटकाला जाऊन अगदी पहिल्या रांगेत बसून तीच अडचण जाणवते. तेव्हा तंत्रावर, अंतरावर दोष लादता येत नाही. पण नाटकाच्या वेळी मी प्रेक्षक असून संवादात निष्क्रिय असल्याने अधूनमधून माझे लक्ष स्टेजची उपेक्षा करून नकळत उडून जाते. नाटक चांगले किंवा वाईट असणे ही गोष्ट कमी महत्त्वाची आहे, पण जे अबोध स्तरावरचे आकलन मातृभाषेतून होते, ते परकीय भाषेतून होऊ शकत नाही. म्हणून ताणाने थकून लक्ष थोडे विसावा घेते, तेव्हा समजून घेण्याच्या प्रक्रियेत खंड पडतो.

अडथळे यायचा तिसरा प्रसंग अर्थाशी संबंधित असतो. वाक्यात एखादा नवीन शब्द आढळला, तर खूपदा संदर्भाच्या मदतीने अर्थ लावता येतो आणि अर्थ लावण्याची ती प्रक्रिया आपोआप होते. पण त्या नवीन शब्दाने माझ्या सवयीबाहेरची कल्पना व्यक्त करण्यात आली, तरच खरी अडचण निर्माण होते. सवयीबाहेरची– म्हणजे तत्त्वज्ञानी किंवा खास क्षेत्रातली नसून दैनंदिन जीवन, निसर्गअनुभव, इ. बद्दलची निराळी संकल्पना conception असलेली कल्पना. ती अडचण पार पडायला जशी प्राथमिक माहिती पाहिजे, तशीच मनाची तयारी करावी लागते. या ठिकाणी अगणित उदाहरणे सांगता

---

१. ' मराठी भाषेतील आंबट–गोड धक्के ' (भाषा आणि जीवन) या माझ्या लेखात मी मराठी माणसाला ' दिशाप्रधान ' असे विशेषण लावले. याचा आता आणखी एक पुरावा सापडला आहे.

येतील, पण वानगीदाखल दोन–तीन सांगून थांबेन. किराणा माल किंवा भाज्या खरेदी करताना आम्ही रशियन माणसे किलोचे माप वापरतो. त्यापेक्षा कमी–जास्त घ्यायचे असेल तर शंभर शंभर ग्रॅम्स कमी जास्त सांगून माल मागतो. एक पावशेराची कल्पना आम्हांला नसल्यामुळे खरेदी करतानाच्या वेळी मी गोगलगाईच्या वेगाने गणित करते. तीच गोष्ट अंतरमापाची. एखादे ठिकाण दुसऱ्या ठिकाणापासून किती लांब असते, याची माहिती देताना मराठी माणूस त्यांच्यातले किलोमीटर[1] सांगतो आणि रशियन माणूस मिनिटांचा अंदाज सांगतो. आणखी एक उदाहरण दिवस–रात्रीच्या मापाचे. मराठी माणसे नैसर्गिक उजेड–काळोख पडल्याप्रमाणे वेळ ठरवतात, असे मला समजते. आम्हां रशियन माणसांचा हिशेब आमच्या कार्यकृतीवर अवलंबून असतो. जोपर्यंत आम्ही झोपत नसतो, तोपर्यंत रशियन संध्याकाळ चालू असते. झोपल्यानंतर रात्र सुरू होते. आणि संबंध रात्र जागरण करायचे असेल, तर मराठी मध्यरात्रीपर्यंत आमची रात्र होत नाही. या कारणासाठी गेल्या रात्रीच्या एखाद्या प्रसंगाचं वर्णन करत असताना मराठी माणसे ‘ काल रात्री झोप नीट लागली नाही ’, तर रशियन माणसे ‘ आज रात्री ’ असे म्हणतील. सकाळचीही कल्पना वेगळी असते. आमची सकाळ माणूस जागे झाल्यानंतर सुरू होते. यामुळे सकाळची चौकट फार लवचीक असते. सुट्टीच्या दिवसांची सकाळ तर ९-१० पर्यंत सुरू होतच नाही. मराठी–रशियन दैनंदिन आयुष्याचे माप वेगळे असून प्रत्येक वेळेला नक्की काय अर्थ आहे– हे कळायला जास्त वेळ जातो.

आणखी एक उदाहरण. हवेचे. रशिया आणि भारत यांच्या हवेतील भिन्नता सतत लक्षात असल्याशिवाय खूप गोष्टी कळायला अवघड जातात. ‘ बघता बघता सुखाच्या अभ्रांची सावली दूर झाली व त्रिविधतापांची झळ तुकारामाला लागावयास सुरुवात झाली.’ हे वाक्य वाचताच सावलीचे रूपक रशियात उन्हाच्या उणिवेमुळे नेहमी वाईट अर्थाचे असते आणि उन्हाची कल्पना नेहमी सुखदायक असते. ही सवयीची समजूत विसरून अतिगरम देशात वावरणाऱ्या भारतीय माणसांना सावली प्रिय आहे– याची आठवण आली पाहिजे. आली नाही, तर काढली पाहिजे. अशा उदाहरणांची यादी सहज वाढवता येईल. भाकरी– पिठले खाल्ल्याशिवाय कसे समजणार? भांडी घासल्याशिवाय या ठिकाणी ‘ घासणे ’ या क्रियापदाची काय गरज आहे, तेही कळणार नाही. आम्ही रशियन बाया भांडी ‘ धुतो ’.

वरीलप्रमाणे प्रसंग येतात, तेव्हा रशियन माणूस सतत संगती लावल्याशिवाय समजू शकत नाही. ही संगती लावायला थोडाफार वेळ लागतो. संगणकाला प्रश्न विचारून पडद्यावर उत्तर यायला अर्धा एक मिनिट लागतं– तसंच.

संबंध दिवस मराठीतून बोलताना समजून घेताना मी खूप दमते. त्यात भर म्हणून अधूनमधून मन दुहेरी नियंत्रणाखाली ठेवणे भाग पडते– भावनांचा स्फोट करणारी एखादी परिस्थिती निर्माण होते, तेव्हा. मराठी आत्मसात करता करता मी माझ्या मनाची, एकाग्र-

तेची सारखी परीक्षा घेते– वारंवार ती परीक्षेत नापास होतात– त्यांना धक्के खावे लागतात. कधी कधी उष्माघात होतो. फार क्वचित दम घ्यायला मिळतो. ही कसरत करता करता चंचल आणि चपळ मनाला शिस्त लावण्यात येते, असे म्हटले, तरी चालेल. (या कारणा-मुळे मला कधीच इगतपुरीला जाऊन विपश्चनेचा अनुभव घ्यायची आवश्यकता वाटली नसेल.) ती कसरत मी जिंकावी म्हणून माझे मराठी मित्र त्यांचे अगदी रक्त आटेपर्यंत मदत करतात. कोणी शिंका, खोकला दाबून भराभर बोलते, कोणी तोंडातल्या तोंडात पुटपुटते, कोणी तोंडाला हात लावून बोलते, तर कोणी स्कूटर चालताना जणू वाऱ्याशी संपर्क साधते– मागे बसून मला काय ऐकू येईल, काय समजेल ? माझ्या एका मैत्रिणी-शिवाय याची तमा कोण बाळगणार ? आणि ती एकदा तोंड मागे फिरवून माझ्याशी बोलायला लागली. आणि अगदी योगायोगाने अपघात टळल्यानंतर ' मराठी समजले नाही तरी, चालेल; पण तू नीट चालव, बाई ' असे वाटून गेले.

ही तुमची मराठी भाषा म्हणजे माझी ' सुळावरची पोळी '. ती ' पोळी ' मला मिळावी, म्हणून माझे मराठी मित्र परत परत तेच तेच पुन्हा पुन्हा म्हणतात.

फ्लॅट ४ जयश्री सहनिवास, ७६९/५ डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.

Boilean

Ce quti se con, coit clalrement s'enonce aisement.
Whaterer is clearly conceived is easily expressed.

' आमची मते अद्यापि थोडीशी अनिश्चित आहेत. तथापि आम्ही ती धाडसाने सांगितली आहेत. कारण, कोणी पूर्वपक्ष न केल्यास उत्तर पक्ष होत नाही, उत्तर पक्ष न झाल्यास वाद होत नाही) आणि वाद न झाल्यास तत्त्वबोध होत नाही. म्हणून आम्ही हें जें निरूपण केले आहे, त्याचेकडे पूर्वपक्ष ह्या नात्यानें लोकांनीं पहावें. आमच्या मतां-संबंधानें आमचा कांहीं अभिनिवेश नाहीं... शास्त्राचें पाऊल पुढें पडावें एवढीच आमची इच्छा आहे.

भिडे, वि. वा. म्हणीविषयी चार शब्द चित्रशाळा १९२७

(२) भाषाभिवृद्धीची (नवी) सामाजिक दृष्टी

दिलीप धोंडगे

भाषा व समाज यांचे नाते अतूट आहे. भाषेला सामाजिक संस्था म्हटले जाते, याचे कारण लग्न, सण, उत्सव, व्रतवैकल्ये, प्रथापरंपरा, इ. सामाजिक हालचालींचे प्रतिबिंब तिच्यात तंतोतंत पडते.

भाषा ही स्वीकारशील व लवचीक आहे. भाषेमुळे समाजातल्या विविध क्षेत्रांत आदान-प्रदान होऊन ती क्षेत्रे उजळून निवतात. माणसांना आपल्या उपजत निर्मितिशीलतेला तर भाषेमुळे खूपच वाव मिळतो.

आता अलीकडे मी आमच्या छोट्याशा परिसरात जे काही शब्द, वाक्प्रचार ऐकतो, ते संदर्भासह नोंदतो.

१. **झीरो बजेट** : मागे महाराष्ट्र शासनाने Zero budget हे वर्षभर राबवले. त्या काळात नोकर–कपात झाली. भरती ठप्प होती. या झीरो बजेटची चर्चा खेड्यापाड्यांपर्यंत झिरपणे स्वाभाविक. अगदी अशिक्षित खेडूत माणसालाही ही घटना जाणवली होती. त्या बापड्यांना झीरो बजेटचा वाच्यार्थ ठाऊक नव्हता, पण लक्ष्यार्थ मात्र कळला होता.

एकदा मी माझ्या गावी गेलो होतो. गाव सुमारे पंधराशे लोकसंख्येचे. सायंकाळी चार–पाच जण एका ओट्यावर गप्पा करीत बसलो होतो. गावातलाच एक शेतकरी सुरतहून टमाटे विकून, आम्ही बसलो होतो, त्या गल्लीतून मळ्याकडे जात होता. आम्हांला पाहून थांबला. एकाला ठाऊक होते, की तो सुरतला गेला होता. त्याने अहिराणीत विचारले,

" काय रे गडा, काय भाव गयात टमाटा ?

" कसानं रे भौ, दोन पाट्या. ईस रूप्या बनात. ट्रकनं भाडं पंध्रा रुप्या गयै. पाच रुप्या च्यापानीले लागात. झीरो बजेटम्या घर वनू. "

मला झीरो बजेटचा झळझळीत व जळजळीत अर्थ तेव्हा कळला.

२. **खळम सोसाटी** : गेली दोन वर्षे या शब्दाची फार चलती. सध्या वापर कमी होतोय्. एकाने म्हटले का, ' चल रे चहाबिहा पाज तर' दुसरा म्हणणार, ' पाजला असता रे पण खळम सोसायटी आहे.'

गावातली वयस्कर माणसे देखील याचा वापर करीत. अमुक अमुकची पोरगी आमच्या पोराला करायची आहे, तर दुसरा म्हणणार, पण तो काय हुंडा देईल ? खळम सोसायटीचा मेंबर आहे.

एकाने तर मी खळम सोसायटीचा चित चेअरमन आहे, असे मला ऐकवले होते.

३. गांढ्यानं दर्सन नको : अहिराणीत गांढ्या म्हणजे सर्वच पातळीवरील कमकुवत व्यक्ती. आर्थिक-शारीरिक-सामाजिक इ.

समजा एखाद्याने नवे कपडे घातले, तर दुसरा म्हणणार, 'आज फार जोर', तर तो नवे कपडेवाला म्हणणार, 'मग, गांढ्यानं दर्सन नही भौ. गांढे आपुले बागच देत नाही.'

संत रामदासांच्या काव्यात 'गांढ्याचे दर्शन नको' असे अगर अशा आशयाचे चरण वाचल्याचे मला स्मरते. पण संदर्भ आठवत नाही.

४. ऐश करणे : आमचं एक शिबिर होतं. शे-दीडशे मुलं एका खेड्यात राहून श्रमदान, साक्षरताप्रसार, कुटुंबकल्याण वगैरे राष्ट्रीय कामं करीत होती. मुलांमध्ये तेवढ्या काळातच ऐश करणं हा शब्दप्रयोग वारंवार ऐकू यायचा. चहा पिताना एक दुसऱ्याला बळजबरीने चहा द्यायचा. तो नको नको म्हणायचा तर हा म्हणणार, अरे, घे. ऐश कर. जेवताना ते एकमेकाला सांगायचे. भरपूर जेवा. ऐश करा. श्रमदानाला निघाले, की कामचुकारपणा करायचा नाही. भरपूर काम करायचं. ऐश करायची.

मला तेव्हा जाणवलं, की : मुलं घरापासून लांब राहून सर्व अडचणीत 'ऐश' करतात, म्हणजे भाषा विविध पातळींवरची नुकसानभरपाई कशी करते !

५. खकाटे कंपनी : मुलामुलांचे मित्रमंडळ असतंच. ते आपल्या मंडळाला खकाटे कंपनी म्हणतात व एकमेकाला खकाऱ्या म्हणतात. अहिराणीत खकाटं म्हणजे धूळ. फुफाऱ्यासारखा खकाऱ्या. खूप सामान्य. थोडक्यात, नायक नाही, तर प्रति-नायक.

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा : ४२३ ३०१ जि. नाशिक.

राजकारण्यांची भाषा

आमचा कार्यक्रम आम्ही अमलात आणून दाखवला- निदान तत्त्वतः तरी.

इटलीमधील पार्तितो पोपोलारे या पक्षातर्फे निवेदन

'लोकशाही जगवायची तर जबाबदारीची जाणीव वाढायला नको का ? नाही तर सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्टाचारापायी...'

'त्याचं काय आहे, या स्विस बँकांचं गुप्ततेचं धोरण नडतं पहा, त्यामुळं भ्रष्टाचार माजतो !'

स्वाभिमान ठीक, पण समन्वय ?

[कर्नाटक संस्कृती : स्वाभिमान आणि समन्वय / ले. डॉ. एम्. चिदानंदमूर्ती / मराठी अनुवाद – कल्याण काळे / साहितिगळ कलाविदर बळग, बेंगळूर / १९९०]

परीक्षण लेखक : **सौ. मृणालिनी गडकरी**

'कर्नाटक संस्कृती : स्वाभिमान आणि समन्वय' ह्या पुस्तिकेचे लेखक डॉ. एम्. चिदानंदमूर्ती हे असून अनुवादक आहेत पुणे विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कल्याण काळे. पुस्तिकेचे नाव, लेखक आणि अनुवादक ह्यांची नावे पाहिल्यावर ह्या छोट्याशा पुस्तिके-बद्दल आपल्या अपेक्षा उंचावणे स्वाभाविक आहे, पण पुस्तिकेचे वाचन केल्यावर मात्र लेखकाने आपली घोर निराशा केलेली आहे हे जाणवते.

कर्नाटक संस्कृतीची वैशिष्ट्ये, ह्या संस्कृतीतील मूलस्रोताबद्दलची माहिती, वचनकार, कवी आणि राजे ह्यांनी दाखविलेले विचारांचे औदार्य आणि सहिष्णू वृत्ती, साहित्य; शिल्प; चित्रकला; नृत्य; गायन ह्या कलांविषयी थोडक्यात दिलेली माहिती एवढ्याच ह्या पुस्तिकेतील जमेच्या बाजू आहेत. येथे कर्नाटक संस्कृतीची दोन वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती म्हणजे स्वाभिमान म्हणजे स्वतःचे संपूर्ण ज्ञान आणि आत्मविश्वास. स्वाभिमानी माणूस जसा स्वतःला कमी लेखत नाही, त्याचप्रमाणे दुसऱ्यालाही कमी समजत नाही. समन्वय म्हणजे सर्व दिशांनी येणाऱ्या विविध पण योग्य गोष्टी आणि स्वतःमधील मूळ गोष्टी ह्यांचे असे एकजिनसी रसायन, की जे जीवनशक्तीचे रूप घेईल. हे सर्वच विवेचन चांगले झाले आहे. मात्र पुढील लेखनात लेखकमहोदयांना आपण केलेल्या विधानांचा विसर पडलेला दिसतो व त्यामुळे अतिशय विरोधी विधाने ते करतात.

कर्नाटकाचा इतिहास आणि संस्कृती आजचा कर्नाटक विसरला आहे हे नमूद करताना लेखकही अनेक गोष्टी लिहिता- लिहिताच विसरलेले दिसतात. कर्नाटकाची व त्यातील लोकांची श्रेष्ठता पटविण्यासाठी ते वाघाच्या बच्च्याची गोष्ट सांगतात. हा मेंढरात वाढलेला वाघाचा बच्चा आपली खरी ओळख पटताच आपल्या पालनकर्त्यांकडे आणि परजातीय बांधवांकडे पाठ फिरवून जंगलात तर निघून जातोच पण जंगलाचे राज्यही मिळवतो. लेखक असेही विधान करतात की, कर्नाटकाने भारतीय अथवा जागतिक संस्कृतीला मौल्यवान देणग्या दिल्या आहेत. येथे लेखक 'स्वाभिमानी माणूस दुसऱ्याला कमी लेखत

नाही ' हे स्वतःच केलेले विधान कर्नाटकबद्दलच्या दुरभिमानामुळे विसरले आहेत.

कर्नाटक संस्कृती म्हणजे स्वाभिमान आणि समन्वय असे म्हणणाऱ्या लेखकाची विचारसरणी काय आहे हे पुढील विधानावरून दिसेलच. लेखक म्हणतात, "कर्नाटकाला दुबळ्या बनविणाऱ्या भारताशी कन्नडिगांना काही कर्तव्य नाही. केवळ वैभवसंपन्न कर्नाटकच, संस्कृतिसंपन्न कर्नाटकच कन्नडिगांची अस्मिता टिकवून ठेवू शकेल." आता प्रश्न असा की भारतापासून फुटून निघून कर्नाटकाचे अस्तित्व अभंग आणि अखंड राहणे शक्य आहे का? कोणीही कर्नाटकापेक्षा प्रबल नाही ह्याला पुरावा काय? कर्नाटक शूरवीर यांची भूमी आहे हे मान्य केले तरी भारतात किंवा जगात दुसरी शूरवीर असलेली भूमी नाहीच ह्याची लेखक महाशयांना खात्री आहे का? ती कशी?

ह्या पुस्तिकेचे लेखक स्वतः फार मोठे संशोधक व अभ्यासक आहेत असे प्रस्तावनेवरून दिसते. मग संशोधनाला आवश्यक असणाऱ्या मूलभूत गोष्टी त्यांना माहीत नाहीत का? वेरूळ, अजिंठा, औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड ह्या शहरात अन्यभाषिकांनी वस्त्या केल्या आणि कन्नडिगांना ह्या सर्वांपासून वंचित केले असे ते म्हणतात. पण ह्यासाठी काहीही पुरावा ते देत नाहीत. ह्याउलट 'कर्नाटकाला स्वतःची अशी नृत्यशैली नाही' असे विधान कोणीतरी केल्यावर मात्र डॉ. चूडामणी नंदगोपालांचा निष्कर्ष थोडक्यात पण मुद्देसूदपणे ते मांडतात. ह्याचा अर्थ पुराव्याशिवाय विधान करायचे नाही. हे त्यांना माहीत आहे. मात्र ह्या माहितीचा उपयोग ते स्वतःच्या सोयीनुसार करतात. हे जातिवंत संशोधकाचे लक्षण खासच नव्हे. येथे मिथ्या अहंकार आणि मनाचा संकुचितपणा ह्याचेच दर्शन होते.

भारतीय संस्कृती अशी काही गोष्टच अस्तित्वात नसल्याचा दावा एके ठिकाणी डॉक्टर करतात; पण त्याचबरोबर कर्नाटक संस्कृतीने भारतीय संस्कृतीत मोलाची भर घातल्याचे सांगतात. डॉक्टरांसारख्या संशोधक अभ्यासकाच्या लिखाणात हा विरोधाभास मुळीच शोभनीय नाही. 'भारतीय संस्कृती' ही संज्ञा डॉक्टरांच्या मनातच स्पष्ट नसल्याने विचारांची ओढाताण झाल्याचे स्पष्टपणे दिसते. 'राष्ट्रीय साहित्य', 'विश्वसाहित्य' ह्यासारखीच ही संज्ञा आहे हे डॉक्टरांना माहीत नसावे ना! 'एखाद्या राज्याची संस्कृती किंवा भाषा म्हणजे भारतीय संस्कृती' असे मानणे संकुचितपणाचे आहे असे विधान केल्यावर डॉक्टर 'कर्नाटक संस्कृतीचे प्रेम देशभक्तीचे खरे चिन्ह आहे' असे विधान लगेच करतात तेव्हा हसावे का रडावे तेच कळत नाही.

पुस्तिकेच्या अखेरीला डॉक्टर कन्नडिगांना भारताच्या विरोधात उभे राहण्याचे आवाहन करतात. डॉक्टरांचा भारत व भारतीयांवर बराच राग आहे. त्याचे एक कारण म्हणजे कर्नाटकाला भारताने दुबळा बनवले असे त्यांचे मत आहे. भारत म्हणजे कोण? आपण सर्वच ना? मग महाराष्ट्र का नाही दुबळा झाला? गुजरात दुबळा का ठरत नाही? कर्नाटक सांस्कृतिक दृष्ट्या अथवा राजकीय दृष्ट्या दुबळा झाला असेल तर तो कन्नडिगांचा

दोष आहे. त्याचे खापर भारताच्या माथ्यावर फोडण्याचे काहीच कारण नाही. डॉक्टर कानडी असल्याचा अभिमान धरतात ह्यात वावगे काहीच नाही, पण आपण भारतीय आहोत ह्याचा त्यांना राग दिसतो. भारताचा ते तिरस्कार करतात तेव्हा आश्चर्य वाटते. येथे समन्वयाला आवश्यक असणाऱ्या समजूतदारपणाचा अभाव असल्याचे दिसते.

आता एका महत्त्वाच्या बाबीकडे वळू या. या पुस्तिकेचा मराठीत अनुवाद करण्या-मागे कानडी-मराठी बंधुभाव वाढण्यास साहाय्य व्हावे हा एक हेतू आहे. पण संबंध पुस्तकात मराठी लोकांचा उल्लेख ' परके ' असा केला गेला आहे. कानडीने मराठीकडून काय घेतले अथवा मराठीला काय दिले ह्याचा ओझरताही उल्लेख नाही. कर्नाटकाचे गुणगान करण्याच्या भरात महाराष्ट्राचा इतिहास व लोक ह्यांचा उल्लेख अवहेलनेने केला गेला आहे. महाराष्ट्राची सीमा लेखकाने आपल्या मनाप्रमाणे बदलली आहे. संशोधक असलेल्या लेखकाने आपल्या मनाप्रमाणे विधाने करून दुरभिमान, दुसऱ्यांच्याबद्दल वाटणारा द्वेष, उद्धटपणा, संकुचितपणा ह्याचेच पुनःपुन्हा प्रदर्शन केले आहे. अशामुळे बंधुभाव वाढणार का तिरस्कार ?

कर्नाटक शिल्प, चित्र ह्याबाबत समृद्ध आहे हे कोणीही नाकबूल करणार नाही पण ह्या कलेला भारतात काय पण जगात तोड नाही असे म्हणणे फारच धाडसाचे आहे. अनेक ठिकाणी कर्नाटक संस्कृतीबद्दल अशी विधाने केली गेली आहेत. ही विधाने आधारहीन, अतिशयोक्तीपूर्ण आहेत.

पुस्तिकेत मुद्रणदोष, चुकीचे शब्द, अशुद्ध मराठी शब्द, व ओळी गाळणे असे प्रकार असंख्य वेळा झाले आहेत. दैवत ऐवजी दैवता, कोमट केलेल्या गरम दुधासारखी ' असे चुकीचे अथवा अनावश्यक शब्द उदाहरणार्थ दाखविता येतील. ' अस्तित्त्व ' ' व्यक्तिमत्व ' असे शब्दही मुद्रणदोषाची उदाहरणे म्हणून दाखविता येतील.

एकूण काय तर ह्या पुस्तिकेच्या वाचनाने कर्नाटक संस्कृतीबद्दल कुतूहल निर्माण होण्याऐवजी खूप करमणूक मात्र होते.

८ अ, कांचनबन, सेनापती बापट रस्ता, पुणे ४११ ०१६.

' वंशवृक्ष ' : अनुवाद-पारितोषिकाच्या निमित्ताने

दत्तात्रय पुंडे

यंदापासून साहित्य अकादमीने एक नवा अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. तो म्हणजे एका भारतीय भाषेतून दुसऱ्या भारतीय भाषेत अनुवादित झालेल्या साहित्यकृतीला पारितोषिक देण्याचा. हे पारितोषिक प्रत्येक भारतीय भाषेतील अनुवादासाठी आहे आणि ते रु. १०,००० / इतके घसघशीत आहे.

मराठीमध्ये हे पारितोषिक पहिल्याप्रथम मिळवण्याचा मान कन्नडमधून मराठीत सातत्याने कथाकादंबरी वाङ्मय अनुवादित करणाऱ्या सौ. उमा विरूपाक्ष कुलकर्णी यांनी पटकावला आहे. त्यांनी प्रसिद्ध कन्नड कादंबरीकार डॉ. एस्. एल्. भैरप्पा यांच्या ' वंशवृक्ष ' या गाजलेल्या कादंबरीचा ' वंशवृक्ष ' या नावानेच मराठीत जो अनुवाद केलेला आहे, त्यासाठी त्यांना हे पारितोषिक दिले गेले आहे. सौ. उमा कुलकर्णी यांचे ' भाषा आणि जीवन 'च्या वतीने मनापासून अभिनंदन. ३२८ पृष्ठांची ही अनुवादित कृती प्रकाशित करण्याचे धाडस ' प्रतिमा प्रकाशन 'चे श्री. अरुण पारगावकर यांनी दाखवले. त्यांचेही अभिनंदन करायलाच हवे.

या अनुवादाच्या निमित्तानेच सौ. उमाताईंच्या अनुवाद-रीतीविषयी थोडे लिहावेसे वाटते. ' वंशवृक्ष 'च्या अनुवादाचे हस्तलिखित मी पाहिलेले असल्याने आणि त्यासंदर्भात सौ. उमाताईंचे आणि माझे काही बोलणे झालेले असल्याने वाचकांसमोर काही माहिती मुद्दाम मांडावी, असे मला वाटते आहे.

श्री. विरूपाक्ष कुलकर्णी यांची मातृभाषा कन्नड आहे आणि गेली तीसेक वर्षे ते मुंबई-पुण्यातच राहिलेले असल्याने त्यांना मराठी चांगले बोलता-लिहिता येते. (' भाषा आणि जीवन 'मध्ये पूर्वी त्यांचा एक लेख प्रसिद्ध झालेला आहेच.) पेशाने अभियंता असलेल्या श्री. कुलकर्णींना साहित्यात-कन्नड, मराठी व इंग्रजी साहित्यात खूपच स्वारस्य आहे. त्यांच्या पत्नी सौ. उमा कुलकर्णी यांची मातृभाषा मराठी आहे. त्यांना कन्नड भाषा चांगली येते. परंतु कन्नड लिपीचे ज्ञान नसल्याने त्यांना कन्नड वाचता येत नाही. असे असूनही त्या कन्नड कथा-कादंबऱ्यांची भाषांतरे कशी करतात ? अन् तीही थेट साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळावे इतक्या उच्च दर्जाची कशी करतात ?

याचे एक इंगित आहे आणि तेच मला अनुवाद-प्रक्रियेत महत्त्वाचे वाटते. श्री. विरूपाक्ष कुलकर्णी अनुवादित करावयाची साहित्यकृती स्वतःच्या आवाजात ध्वनिफितीवर ध्वनिमुद्रित करून ठेवतात. सौ. उमाताई ध्वनिफीत ऐकून आपले अनुवादकार्य करीत

अनुक्रमणिका

राहतात. याचा त्यांना एक फायदा होतो. तो म्हणजे त्या छापलेल्या शब्दांत अडकून पडत नाहीत. त्यामुळे शब्दाला प्रतिशब्द शोधत बसण्याचा नसता खटाटोप त्यांच्या मनाला प्रासत नसणार, हे उघडच आहे. ' वाचून ' नव्हे तर ' ऐकून ' अनुवाद करीत राहण्याच्या त्यांच्या या रीतीमुळे त्यांचा अनुवाद आपोआप जिवंत व रसरशीत होत राहतो. ' वंशवृक्ष 'च्या अनुवाद-यशाचे रहस्य त्यांच्या या अनुवादाच्या अनोख्या पद्धतीत आहे. (या बाबतीत त्यांचे पती श्री. विरूपाक्ष कुलकर्णी त्यांना जी साथ देत आहेत, ती खरोखर स्तुत्य नि अभिनंदनीय आहे.)

तात्पर्य, लिखित नव्हे, तर बोलली–ऐकली जाते, तीच खरी भाषा, हे सौ. उमा कुलकर्णी यांनी केलेल्या ' वंशवृक्ष 'च्या अनुवादावरून (आणि त्यांच्या इतर अनेक अनुवादांवरूनही) लक्षात यावे.

मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ४११००५,

पाराग्वायमधील एका राजकारण्याचे एका फ्रेंच पत्रकाराला उत्तर.

खेदाची गोष्ट म्हणजे एक निरपराध फ्रेंच माणूस बळी पडला.

फ्रान्सचे तत्कालीन प्रधानमंत्री रेयों बार (संदर्भ : १९७८ मध्ये एका यहुदी लाल देवळावर हल्ला झाला. त्यात चार फ्रेंच माणसे दगावली– त्यांच्यापैकी तीन यहुदी होती.)

अनुक्रमणिका

पैसे भरण्याबद्दल सूचना

पैसे रोख दिल्यास आठवणीने पावती घ्यावी. चेक ' मराठी अभ्यास परिषद ' या नावाने काढावा. मनीऑर्डर कूपनवर किंवा चेकसोबतच्या चिठ्ठीवर पैसे पाठवणाराचे नाव, पत्ता, रक्कम, आणि ती कशापोटी पाठवली ते अवश्य लिहावे. नमुना अंक मिळाला असल्यास कोणता मिळाला याचा उल्लेख करावा. चेक बँकेच्या पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत २ रुपये वटणावळ म्हणून भर घालावी. पावती मागाहून पाठविली जाईल.

पत्रिकेची वर्गणी

पत्रिकेची वार्षिक वर्गणी भरताना पत्रिकेचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असेच राहील हे लक्षात घ्यावे. पत्रिकेचे वर्षात चार अंक निघतात. मात्र १९८३ मध्ये केवळ दोनच अंक निघाले आहेत. पत्रिकेचे चालू वर्षाव्यतिरिक्तचे अंक हवे असल्यास मिळू शकतील. सध्या-तरी त्यांची आकारणी वर्गणीच्याच दरात करण्यात येते. ती पुढीलप्रमाणे :

चालू वर्गणी परिषदेच्या सामान्य सभासदांसाठी (सभासद वर्गणी धरून) वर्षाला ३० रु.

चालू वर्गणी संस्था आणि सभासद नसलेल्या व्यक्ती यांसाठी वर्षाला ४० रु.

सुट्या अंकाला (मग तो चालू वर्षाचा असो की मागील वर्षांपैकी असो) १० रु.

मागील अंक मागवताना वर्ष १ (१९८३) मध्ये फक्त दोन अंक निघाले, वर्ष २ (१९८४) पासून मात्र दर वर्षाला चार अंक निघाले हे लक्षात घ्यावे.

परिषदेची वर्गणी

सामान्य सभासदाची वार्षिक वर्गणी वर दिलीच आहे. एका घरात एकापेक्षा अधिक सामान्य सभासद असले आणि त्यांपैकी एकाच्याच नावावर पत्रिकेचा अंक हवा असला तर इतर सभासदांनी केवळ १५ रु. भरायचे आहेत. उदाहरणार्थ, एका घरात दोन सभासद आणि एक अंक अशी स्थिती असल्यास वर्षाला ३० रु. + १५ रु. भरावे लागतील.

आजीव सभासदत्वासाठी २०० रु. (परदेशी अंक पाठवायचा असल्यास शिवाय १०० रु.); देणगीदारासाठी ५०० रु. किंवा जास्त; आश्रयदात्यासाठी १००० रु. किंवा जास्त. (आजीव, देणगीदार, आश्रयदाता सभासदांना पत्रिकेची वेगळी वर्गणी नाही.)

परिषदेचे सभासदत्व व्यक्तीला मिळेल, संस्थेला नाही.

जाहिरातीसाठी दर

पूर्ण पान ७५० रु., अर्धे पान ४०० रु., पाव पान २५० रु., शुभेच्छासुचना १०० रु., आवरणपृष्ठ चार १००० रु., आवरणपृष्ठ दोन / तीन ८०० रु. जाहिरात हिंदीत वा इंग्रजीत असल्यास चालेल, मराठीत असल्यास उत्तम.

नोंदणी क्रमांक 040048/83

मराठी अभ्यास परिषदेच्या वतीने

संगणक आणि मराठी भाषा

प्रदर्शने आणि चर्चासत्र

पुणे येथे जून मध्ये झाले त्यानिमित्त प्रकाशित झालेली

पुस्तिका

आता उपलब्ध आहे.

मॅक्सीन बर्न्सन, अशोक रा. केळकर, निनाद माटे,
कूपर- जोशी- चितळे, अर्जुनवाडकर, गायकैवारी
यांचे माहितीपूर्ण व विचारप्रवर्तक लेख

वि. द. आपटे यांची संगणक परिभाषा (इंग्रजी-मराठी)
पुण्यातील संगणक शिक्षणाच्या सोयींची एक उपयुक्त सूची

किंमत ५ रुपये

संपर्क
मराठी अभ्यास परिषद, द्वारा अक्षरछाया,
२०३५ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११ ०३०